निपक्ष व निर्भिड वृत्तपत्र

# आत्ताच एक्सप्रेस

छत्रपती संभाजीनगर
पाने : ४
किंमत : २.००
वर्ष : १५ वे
अंक : २८५ वा.
शुक्रवार :१९ डिसेंबर २०२५

मुख्य संपादक- सुग्रीव मुंडे | E-mail:dainikattachexpress@gmail.com | E-Paper : http://attachexpress.in | Post Regd.No. ABD-441/2024-26 | RNI.No.MAH/MAR2011/39247

## माजी मंत्री माणिकराव कोकाटेंच्या अटकेची शक्यता

**आत्ताच एक्सप्रेस**
**मुंबई-नाशिक / प्रतिनिधी** / राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते व माजी मंत्री माणिकराव कोकाटे यांना अटक करण्यासाठी नाशिक पोलिसांची १३ जणांची विशेष टीम मुंबईत दाखल झाली आहे. या पथकात १० हवालदार आणि ३ अधिकारी असून, पथक वांद्रे पोलिस ठाण्यात दाखल झाल्याची माहिती आहे.कोकाटे यांच्याविरोधात अटक वॉरंट जारी झाल्यानंतर त्यांच्या अडचणी वाढल्या आहेत. सध्या ते वांद्रे येथील लीलावती रुग्णालयात उपचार घेत असून, नाशिक पोलिसांची टीम मुलुंड टोलनाका पार करून मुंबईत दाखल झाली



आहे. अर्ध्या तासात पथक लीलावती रुग्णालयात पोहोचण्याची शक्यता असून, अटकेची प्रक्रिया सुरू केली जाणार आहे.

**नाशिक पोलिसांची १३ जणांची टीम मुंबईत दाखल**

**वैद्यकीय अहवालानंतर पुढील निर्णय**

कारवाईपूर्वी कोकाटे यांचा सध्याचा वैद्यकीय अहवाल तपासून तज्ज्ञ डॉक्टरांचा सल्ला घेतला जाणार आहे. त्यानंतर पुढील कायदेशीर कारवाईबाबत निर्णय घेतला जाईल. न्यायालयाचे आदेश असल्याने मुंबई पोलिसांना कळवणे बंधनकारक नसले तरी, समन्वयासाठी वांद्रे पोलिसांना माहिती दिली जाऊ शकते, असे सूत्रांनी सांगितले.

**नेमके प्रकरण काय?**

नाशिक शहरातील कॅनडा कॉर्नर परिसरातील 'न्यू व्ह्यू अपार्टमेंट' येथे अल्प उत्पन्न गटासाठी राखीव असलेली सदनिका माणिकराव कोकाटे यांनी सुमारे ३० वर्षांपूर्वी कमी उत्पन्न दाखवून मिळवली होती. मुख्यमंत्री कोट्यातून कोकाटे यांच्यासह विजय कोकाटे, पोपट सोनवणे आणि प्रशांत गोवर्धने या चौघांना ही सदनिका मिळाल्याचा आरोप आहे.या प्रकरणात फेब्रुवारी २०२५ मध्ये नाशिक जिल्हा न्यायालयाने कोकाटे यांना दोषी ठरवले होते. त्यानंतर सत्र न्यायालयानेही शिक्षा कायम ठेवली. सध्या या निर्णयाविरोधात कोकाटे यांनी उच्च न्यायालयात धाव घेतली आहे. न्यायालयाच्या निकालानंतर त्यांनी मंत्रिपदाचा राजीनामा अजित पवार यांच्याकडे सुपूर्द केला होता.

## निवडणूक आली की येता, पाच वर्ष कुठं असता? - अजित पवारांचा विरोधकांवर घणाघात

**आत्ताच एक्सप्रेस**
**बारामती /प्रतिनिधी/** निवडणूक आली की विरोधक दिसतात, पण पाच वर्षे कुठे असतात? असा थेट सवाल करत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी विरोधकांवर जोरदार टीका केली. बारामतीच्या विकासाची तुलना सिंगापूरशी करत, सिंगापूरच्या धर्तीवर बारामती स्मार्ट सिटी करण्याचा आमचा मानस आहे, असेही त्यांनी स्पष्ट केले.

बारामती नगरपरिषदेच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर झालेल्या सभेत बोलताना अजित पवार म्हणाले की, बाकी तालुके आणि बारामतीची परिस्थिती बघा. काही त्रुटी असतील, पण जे बदल झालेत ते फक्त अजित



पवार करू शकतो. विरोधक केवळ गल्लीबोळ दाखवून बदनामी करण्याचा प्रयत्न करत असल्याचा आरोपही त्यांनी केला.

नगरपरिषदेत आतापर्यंत ८ नगरसेवक बिनविरोध निवडून आले असून उर्वरित ३३ उमेदवार रिंगणात आहेत. १९९१ पासून जनतेने दिलेल्या पाठिंब्याचा उल्लेख करत, मी सरकारमध्ये असो वा नसो, बारामतीसाठी निधी आणून दर्जेदार काम करण्यावरच भर दिला, असे त्यांनी सांगितले.

आज मी सरकारमध्ये असल्यामुळे केंद्र व राज्यातून निधी आणू शकतो. ४०-४५ कोटींच्या बजेटमध्ये विकास मर्यादित होतो, पण माझ्या ओळखीमुळे मोठे प्रकल्प शक्य होतात, असे सांगत त्यांनी नर्सिंग कॉलेज, कॅन्सर हॉस्पिटल, कृषी विज्ञान केंद्र, सायन्स पार्क यांसारख्या प्रकल्पांची माहिती दिली. कॅन्सरचे वाढते प्रमाण लक्षात घेता तंबाखू, गुटखा टाळण्याचे आवाहनही त्यांनी केले.

मला ४१ पैकी ४१ नगरसेवक निवडून द्या. बारामतीत खखढ आणि खखच् आणण्याचा प्रयत्न करेन, असा शब्द त्यांनी जनतेला दिला. घरातील लोकही कधी साथ देत नाहीत, पण जनता साथ देते म्हणून मी झोकून काम करतो, असे भावनिक विधानही त्यांनी केले.

बाहेरच्यांच्या हस्तक्षेपाबाबत इशारा देताना अजित पवार म्हणाले, बाहेरच्यांचा अजिबात नाद करू नका, फक्त माझा नाद करा. दिल्लीसह देशभरात बारामतीच्या विकासाबाबत कुतूहल असल्याचेही त्यांनी नमूद केले. शेवटी, राज्यात महायुतीचे सरकार कायम राहील, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

## रामराव पाटील माध्यमिक विद्यालयाची सहल संपन्न

**आत्ताच एक्सप्रेस**
**केज/ प्रतिनिधी** / शहरातील रामराव पाटील माध्यमिक विद्यालयाची शैक्षणिक सहल दि. दि १४ डिसेंबर ते १७ तीन दिवशीय सहल भीमाशंकर- लेण्याद्री- ओझर- शिवनेरी- नाशिक त्रिंबकेश्वर- भंडारदरा -कळसुबाई- शिर्डी -शनिशिंगणापूर- मोहटा देवी आदी ठिकाणी. भेटी देऊन संपूर्ण झाली यादरम्यान शिक्षकांनी विद्यार्थ्यांना विविध स्थळाबद्दल भौगोलिक ऐतिहासिक माहिती देऊन त्यांच्या अभ्यासक्रमा इतर उपक्रमात भर घातली.सहलीमध्ये मुलांनी ऐतिहासिक,भौगोलिक, नौकानयन, धार्मिक- सांस्कृतिक स्थळी निसर्गाच्या सानिध्यामध्ये विद्यार्थ्यांना अनुभूती मिळाली विद्यार्थ्यांनी स्थानिक खाद्य पदार्थांचा येथेच्छ लाभ घेतला.

## ठाकरेंची ही शेवटची निवडणूक; निवडणुकीनंतर कार्यकर्तेही राहणार नाहीत - रावसाहेब दानवे

**आत्ताच एक्सप्रेस**
**मुंबई/प्रतिनिधी/**भाजपचे नेते आणि माजी केंद्रीय मंत्री रावसाहेब दानवे यांनी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्यावर जोरदार टीका केली आहे. ठाकरे बंधू एकत्र येण्याच्या चर्चांवर प्रतिक्रिया देताना दानवे म्हणाले की, ही ठाकरेंची शेवटची निवडणूक ठरणार आहे. निवडणुकीनंतर त्यांच्या जवळ कार्यकर्तेही राहणार नाहीत. कार्यकर्ते आपापले राजकीय भविष्य स्वीकारतील.ते पुढे म्हणाले, मागील निवडणुकीचा मी साक्षीदार आहे. तेव्हा आम्ही एकत्र सरकारमध्ये होतो, म्हणूनच त्यांना महापालिका दिली. अन्यथा आम्ही आमचा महापौर बसवला असता.

**माणिकराव कोकाटे प्रकरणावर दानवेंची प्रतिक्रिया**

माजी मंत्री माणिकराव कोकाटे यांच्या राजीनाम्याबाबत बोलताना दानवे म्हणाले की, कोकाटेंनी अजित पवार यांच्याकडे राजीनामा दिला होता आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी तो स्वीकारला आहे. कायद्यापेक्षा कोणी मोठे नाही, हे आमच्या सरकारने दाखवून दिले आहे.

ते पुढे म्हणाले, नवाब मलिक जेलमध्ये गेले तरी त्यांनी राजीनामा दिला नव्हता. मात्र माणिकराव कोकाटेंनी राजीनामा दिला. जे काही झाले ते नियमाप्रमाणेच झाले.

**राज्यात २९ महानगरपालिकांच्या निवडणुकांचे बिगुल**

दरम्यान, राज्यातील २९ महानगरपालिकांच्या निवडणुकांचे बिगुल वाजले असून,१५ जानेवारी रोजी मतदान तर १६ जानेवारी रोजी निकाल जाहीर होणार आहेत.या पार्श्वभूमीवर राज्यातील राजकीय घडामोडींना वेग आला असून, मोठ्या प्रमाणात भाजपमध्ये पक्षप्रवेश सुरू असल्याचे चित्र दिसत आहे.

**धनंजय मुंडे आणि सुप्रिया सुळे यांच्यावरील वक्तव्य**

धनंजय मुंडे यांच्या मंत्रिमंडळातील समावेशाबाबत विचारले असता दानवे म्हणाले, हा निर्णय अजित पवार आणि देवेंद्र फडणवीस घेतील. मी त्यावर भाष्य करू शकत नाही.

यावेळी त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्या सुप्रिया सुळे यांच्यावरही टीका करत सवाल केला की, धनंजय मुंडे यांच्याबाबत सुप्रिया सुळे यांची दुश्मनी असण्याचं नेमकं कारण काय?

तसेच, ७५ वर्षांत सुप्रिया सुळे यांनी कधीही उपोषण केले नव्हते. पुढील काळात त्यांच्यावर अनेक वेळा उपोषण करण्याची वेळ येईल, असेही ते म्हणाले.

## सातारा ड्रग्ज प्रकरण! पोलिसांकडून तीन जणांना अटक

**आत्ताच एक्सप्रेस**
**सातारा/प्रतिनिधी/** जिल्ह्यातील सावरी गावातील असणाऱ्या शेडवर मुंबई पोलिसांनी टाकलेल्या धाडीत ४५ किलो ड्रग्जचा साठा सापडला होता. या ड्रग्जची बाजारपेठेतील किंमत १४५ कोटी रुपये इतकी आहे, त्या ठिकाणी काम करत असलेल्या तिघांना एकनाथ शिंदे यांचा भाऊ प्रकाश शिंदे याच्या जावळी तालुक्यातील हॉटेल तेज यश मधून जेवण जात असल्याचा असा खळबळजनक आरोप ठाकरे गटाच्या उपनेत्या सुषमा अंधारे यांनी केला. दरम्यान, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंचे बंधु प्रकाश शिंदेंबाबत करण्यात आलेल्या आरोपानंतर गुन्हे शाखेच्या पोलिसांकडून महत्वाचा खुलासा करण्यात आला आहेय.

या प्रकरणी पोलिसांकडून आतापर्यंत तीन जणांना अटक करण्यात आली आहे.

दरम्यान, या प्रकरणी पोलिसांकडून आतापर्यंत तीन जणांना अटक करण्यात आली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार साताऱ्यातील जावळी बामनोली गावात सुरू असलेल्या ड्रग्ज कारखान्यावर कारवाई करण्यात आली होती. या कारवाईत ओंकार डिगे याचा सहभाग स्पष्ट झाल्यानंतर त्याच्यावर अटकेची कारवाई करण्यात आली आहे. ओंकारच्या चौकशीतून यातील इतर सहभागी आरोपींची नावे समोर आल्यानंतर गुन्हे शाखेच्या पोलिसांनी नजर अब्बास सयद उर्फ सद्दाम २९, राजीकुल रहमान ३०, हाजीबुल इस्लाम २५ या तिघांना अटक करण्यात आली आहे.

तपासातील एक आरोपी पालघरमध्ये आहे. तर एक आरोपी हे आसामच्या मोरीगावचे असल्याचे निष्पन्न झाले आहेत. तसेच या कारवाईनंतर त्याचा संदर्भ देत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंचे बंधु प्रकाश शिंदें यांच्या जमिनीवर असलेल्या हॉटेलशी जोडण्यात येत होता. त्याबाबत पोलिसांनी खुलासा करताना प्रकाश शिंदेंनी भाडेतत्वावर दिलेल्या जागेत सुरू असलेल्या हॉटेल तेजयश मधून आरोपींना कुठलेही जेवण दिले जात नसल्याचे पोलिसांनी स्पष्ट केले. तर दरेगावातील सरपंच रणजीत शिंदे यांचा नमुद गुन्ह्याच्या तपासामध्ये अद्यापपर्यंत कोणताही संबध निर्दर्शनास आला नसल्याचे गुन्हे शाखेच्या पोलिसांनी स्पष्ट केले आहे.

**सुषमा अंधारे यांनी नेमके काय आरोप केले?**

१३ डिसेंबर रोजी सावरी गावात कारवाई झाली. सुरवातीला मुकंद गावात कारवाई झाली होती. त्याचे धागेदोरे पुण्यात आले. यात विशाल मोरे याला ताब्यात घेण्यात आले असून पोलिसांकडून त्याची चौकशी सुरू आहे. त्याच्या चौकशीतून सावरी गावाची माहिती मिळाली. या गावात पोलिसांचे पथक पोहोचले. मी स्वतः सावरी गावात जाऊन आले आणि मला काही धक्कादायक माहिती मिळाली. याठिकाणी कोयनेचे बॅकवॉटर आहे. इथे स्विमिंग टँक तयार होत आहेत. रिसॉर्ट होत आहे.. इथून जवळ असणाऱ्या पत्र्याच्या शेडमध्ये कारवाई करण्यात आली. इथे ७५ लाख खर्च करून रस्ता तयार करण्यात आला आहे. इथे गाव नाही, माणूस नाही तरी येथे शेडला जोडणारा रस्ता का तयार करण्यात आला? येथील रिसॉर्टमध्ये सात ते आठ रूम बांधून तयार आहेत. या रिसॉर्टमध्ये अनेक सुविधा आहेत. याठिकाणी एक डस्टर गाडी आहे. पोलिसांनी या रिसॉर्टमध्ये केलेल्या कारवाईत ४५ किलो ड्रग्स सापडले. याची किंमत १४५ कोटी आहे. ही बातमी फार चर्चेत आले नाही. हे रिसॉर्ट प्रकाश शिंदे यांच्या मालकीचे आहे. या शेडचा मालक गोविंद सिंदकर.आहे. याच्या शेडची चावी ओंकार दिघे याने घेतली अशी माहिती गोविंद याने दिली. ओंकार दिघे याला पोलिसांनी ताब्यात घेतले आणि सोडले. पोलिसांनी त्याला का सोडलं हे अजून माहीत नाही. मुंबई पोलिस त्याठिकाणी का गेले?, असे सवाल सुषमा अंधारे यांनी उपस्थित केले.

## कोकाटेंचा राजीनामा; आता संजय शिरसाठ यांच्याही 'विकेट'ची वाट पाहतोय - रोहित पवारांचा सूचक इशारा

**आत्ताच एक्सप्रेस**
**मुंबई /प्रतिनिधी/**राज्याचे क्रीडामंत्री माणिकराव कोकाटे यांनी अखेर आपल्या मंत्रिपदाचा राजीनामा दिला आहे. सदनिका घोटाळाप्रकरणी नाशिक सत्र न्यायालयाने दोन वर्षांची शिक्षा कायम ठेवल्यानंतर वाढलेल्या राजकीय दबावामुळे हा निर्णय घेण्यात आल्याचे बोलले जात आहे.कोकाटेंच्या राजीनाम्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) चे आमदार रोहित पवार यांनी तीव्र प्रतिक्रिया देत सरकारवर निशाणा साधला आहे. निसटण्याचे सगळे मार्ग संपल्याने नाईलाजाने घेतलेला हा राजीनामा आहे, असे म्हणत त्यांनी सूचक ट्विटद्वारे मंत्री संजय शिरसाठ यांच्याही विकेटची वाट पाहत असल्याचा इशारा दिला आहे.रोहित पवार म्हणाले की, कनिष्ठ न्यायालयाने शिक्षा सुनावली तेव्हाच नैतिकतेच्या आधारावर कोकाटेंनी राजीनामा द्यायला हवा होता. तसे झाले असते तर कायद्याचा सन्मान राखला गेला असता आणि समाजात योग्य संदेश गेला असता. मात्र, अशी अपेक्षा कोकाटेंकडून करणं चुकीचं असल्याची टीकाही त्यांनी केली.दरम्यान, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कोकाटेंची सर्व खाती काढून घेतली असून क्रीडा व युवक कल्याण, अल्पसंख्याक विकास आणि औकाफ ही खाती उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडे सोपवण्यात आली आहेत. राज्यपालांनीही या खातेबदलास मंजुरी दिली आहे. त्यामुळे माणिकराव कोकाटे सध्या बिनखात्याचे मंत्री झाले आहेत.कोकाटेंनी सत्र न्यायालयाच्या निर्णयाविरोधात मुंबई उच्च न्यायालयात धाव घेतली असून त्यावर शुक्रवारी सुनावणी होणार आहे. मात्र, त्याआधीच त्यांनी मंत्रिपदाचा राजीनामा दिल्याने राज्याच्या राजकारणात नव्या घडामोडींना वेग आला आहे.

## गुटखा उत्पादकांवर नववर्षात मकोका; कायदा अधिक कठोर होणार - मंत्री नरहरी झिरवाळ

**आत्ताच एक्सप्रेस**
**मुंबई /प्रतिनिधी/** राज्यात गुटख्यावर बंदी असतानाही शाळा, महाविद्यालय परिसरांसह अनेक ठिकाणी सर्रास गुटखा विक्री होत असल्याचे आढळून येत आहे. या पार्श्वभूमीवर गुटखा बंदी कायद्याची कडक अंमलबजावणी करण्यासाठी गुटखा उत्पादकांवर महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण कायदा (मकोका) लागू करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. येत्या नवीन वर्षात गुटखा उत्पादकांवर मकोका लागू करण्यात येणार असल्याची माहिती अन्न व



औषध प्रशासन व विशेष सहाय्य मंत्री नरहरी झिरवाळ यांनी दिली.यापूर्वी गुटखा उत्पादक व विक्रेत्यांवर मकोका लावण्याचा प्रस्ताव विधि व न्याय विभागाकडे पाठवण्यात आला होता. मात्र सध्याच्या कायद्यातील तरतुदींनुसार हार्म आणि हर्ट या दोन्ही घटकांचा अभाव असल्याने हा कायदा लागू होऊ शकत नव्हता. त्यामुळे या कायद्यात आवश्यक दुरुस्त्या करून गुटखा व्यवसाय करणाऱ्यांवरही मकोका लागू करता येईल, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत दिली होती.

त्यानुसार नागपूर येथे पार पडलेल्या हिवाळी अधिवेशनानंतर अन्न व औषध प्रशासन विभागाने कामाला सुरुवात केली आहे. गुटखा उत्पादकांपर्यंत पोहोचण्यासाठी विशेष धोरण आखले जाणार असून, कायद्यातील त्रुटी दूर करण्यासाठी दुरुस्ती प्रस्ताव तयार करण्यात येणार असल्याचे मंत्री झिरवाळ यांनी स्पष्ट केले.गुटखा बंदी कायदा अधिक कठोर करण्यासाठी आवश्यक बदल करून सुधारित प्रस्ताव लवकरात लवकर विधि व न्याय विभागाकडे सादर करण्याचे निर्देश मंत्री नरहरी झिरवाळ यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिले आहेत.

## टेंभुर्णी जवळ भीषण अपघात; टेम्पो-स्कुटी धडकेत एक ठार, १८ जखमी

**आत्ताच एक्सप्रेस**
**जाफ्राबाद / प्रतिनिधी/** टेंभुर्णीच्या दिशेने येणाऱ्या चिखली-दाभाडी मार्गावरील देळेगव्हाण फाट्याजवळ शुक्रवारी भीषण अपघात झाला. टेम्पो आणि स्कुटी यांच्यात झालेल्या धडकेत टेंभुर्णी येथील ६२ वर्षीय शेतकरी रमेश किसन जाधव यांचा घटनास्थळी मृत्यू झाला, तर टेम्पोतील लहान मुलांसह १८ जण जखमी झाले आहेत.चिखली-दाभाडी परिसरातून अर्दक काढणीसाठी गेलेले मजूर आपल्या कुटुंबासह टेम्पो (MH 06 -G 4877) मधून राजूर-टेंभुर्णी रस्त्याने येत होते. देळेगव्हाण फाट्याजवळील पेट्रोल पंपासमोर बुद्ध विहाराच्या समोर स्कुटीस्वाराला वाचविण्याच्या प्रयत्नात टेम्पोची जोरदार धडक झाली. याच अपघातात मोटारसायकल (MH 21 CF 6934) चालविणारे रमेश जाधव यांचा मृत्यू झाला.

**जखमींमध्ये चिमुकल्यांचा समावेश; देळेगव्हाण फाट्यावर अपघातांचे सत्र सुरूच**

अपघातानंतर जखमींना तातडीने टेंभुर्णी ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले. प्राथमिक उपचारानंतर तीन रुग्णवाहिकांद्वारे सुमारे १० जणांना जालना येथे हलविण्यात आले, तर उर्वरित जखमींनाही पुढील उपचारासाठी जालना येथे पाठविण्यात आले.या अपघातात जखमी झालेल्यांमध्ये विक्रम आवासे, गणेश आवासे, देवसिंग जाधव, खुमशिंग आवासे, बिलाजी आवासे, आकाश चव्हाण, समीर तारठे, परी आवासे, अनिता आवासे, बळीराम आवासे, रोहित चव्हाण, रंजना चव्हाण, राधिका सोलुंके, राजाराम दावत, रूपसिंग आवासे, रोपला खिसके, मोलीबाई आवासे यांचा समावेश आहे. काही जखमींना फ्रॅक्चर असल्याची माहिती रुग्णालय प्रशासनाने दिली.





अपघातानंतर डॉ. अमोल वाघ, डॉ. सचिन बदर, डॉ. चव्हाण, रुग्णवाहिका चालक-कर्मचारी तसेच कपिल जाधव, शारेक सिद्दीकी यांच्यासह अनेक सामाजिक तरुणांनी मदतीसाठी धाव घेत मानवतेचे दर्शन घडविले.मयत रमेश जाधव यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, एक मुलगी, सुना व नातवंडे असा परिवार आहे. दुपारी त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी मोठा जनसमुदाय उपस्थित होता.

**अपघातप्रवण ठिकाणाकडे प्रशासनाचे दुर्लक्ष?**

देळेगव्हाण फाटा हा परिसर अपघातप्रवण असून यापूर्वीही येथे वाहन थेट विहिरीत जाऊन सहा जणांचा मृत्यू झाला होता. त्यामुळे या ठिकाणी स्पीड ब्रेकर, अपघात सूचक फलक व सुरक्षितता उपाययोजना करण्याची जोरदार मागणी नागरिकांकडून होत आहे.

# शाळेच्या वेळा बदलाव्यात का?

शाळेच्या वेळा बदलाव्यात का? हा एक चर्चेचा विषय. सरकारनं या संदर्भात आदेश काढलेत व या संदर्भात वातावरण गरम झालं. मग चर्चा उमटल्या. वाद प्रतिवाद झाले. कारण आजच्या काळात बऱ्याचशा शाळा या सकाळी भरतात. कारण असते वर्गखोल्याची कमतरता. विद्यार्थी जास्त असतात आणि बसण्याची जागा अपूरी असते. त्यातच सकाळच्या शाळा. अशावेळेस प्रश्न निर्माण होतो की सकाळी उठायचे कसे? त्यातच आता थंडीचेही दिवस. सकाळी उठणं म्हणजे विद्यार्थ्यांसाठी तारेवरची कसरत. जर शाळेची वेळ बदलली तर थंडीवर मात करता येवू शकते. ही एक सकारात्मक बाजू. सर्वप्रथम आपण सकारात्मक बाजूने बोलू.

शाळेच्या वेळा बदलाव्यात. हा सकारात्मक दृष्टीकोनातील विषय. या बाजूनं मत मांडतांना मी म्हणेल की शाळेच्या वेळा बदलाव्यात. त्याला खालील दृष्टिकोन महत्वाचे ठरतात. पहिलं कारण म्हणजे थंडी. थंडीत सकाळी उठायला त्रास वाटतो. तसंच दुसरंही कारण आहे व ते कारण मानसशास्त्रज्ञ मानतात. ते कारण आहे, झोप. थंडीच्या दिवसात सकाळी झोप चांगली लागते. झोप ही पुर्णच व्हायला हवी. पुर्ण झोप झाली तर आपला मेंदू हा ताजातवाना राहतो. त्यातच त्या मेंदूत जाणारं ज्ञान हे लवकर मेंदूत शिरतं व ते ज्ञान चिरंतन टिकतं. असे मानसशास्त्र तज्ज्ञांचे म्हणणे आहे. तिसरं कारण म्हणजे आजच्या मुलांचं मोबाईल पाहाणं. आजच्या काळात मोबाईलचं फॅड आलं आहे व या काळात मुलं रात्री बराच वेळपर्यंत जागतात. शिवाय आजची मुलं ही आपल्या आईवडीलांपेक्षा वेगळी म्हणजेच हुशार आहेत. ती मुलं मोबाईलवर खेळ वैगेरे पाहात असतात. परंतु सर्वच मुलं हे खेळ पाहात नाहीत वा खेळ खेळत नाहीत. काही मुलं ही माहिती देखील पाहात असतात. त्यातच बऱ्याचशा मुलांचा अभ्यास हा रात्रीलाच होतो. रात्री शांतता असते. दिवसा कोलाहल असतो. म्हणून ते जागतात. ते सकाळी उशिरा उठतात. अन् सकाळी लवकर उठली आणि सकाळच्या शाळेला गेली तर त्यांची झोप पुर्ण न झाल्यानं ना त्यांचं मन अभ्यासात लागत, ना ते अभ्यासक्रम नीट शिकू शकत. अशातच विद्यार्थ्यांचं नुकसान होत असतं.

चवथ्या मुद्दा तर यापेक्षा वेगळा आहे. सकाळी लवकर उठणे ही आपल्यासाठी कंटाळवाणी गोष्ट आहे. परंतु शाळा आहे म्हणून दररोज उठावच लागतं. एकतर उठायचा कंटाळा आणि एखाद्या वेळचं ठीक आहे. परंतु रोज रोज उठणं. ज्यातून आपल्याला राग येतो व तो राग आपल्यासाठी एक घाणेरडी सवय बनतो. एवढंच नाही तर तोच राग एखाद्या घातक आजाराचं लक्षण बनू शकते. हळूहळू त्याच रागाचं रुपांतर एखाद्या असाध्य रोगात होत असतं. तो आजार गंभीर स्वरुपाचा ठरु शकतो. ज्याचा उपायच निघत नाही.

विशेष सांगायचं झाल्यास कोणताही आजार हा अचानक जरी उद्भवत असला तरी तो आजार व्हायला काही लक्षणं जबाबदार असतात. जे लक्षण आधीपासूनच सुरुवात करीत असतात. ज्यातील एक लक्षण म्हणजे सकाळी लवकर उठणे. यासाठी तरी शाळेच्या वेळा बदलायला हव्यात.

पाचवा आणि सर्वात महत्वाचा मुद्दा म्हणजे आपल्या आईवडीलांना आपल्यामुळं होणारा त्रास. आपल्या शाळेनुसार सकाळी लवकर फक्त आपल्यालाच उठावं लागते असं नाही. आपल्या परीवारालाही सकाळी लवकर उठावं लागतं. त्यातील काही आपले आईवडील असतात. खासकरुन आई असते. त्यांनाही आपल्यासाठी उठावंच लागतं. ज्यांना आपल्या शाळेशी व सकाळी उठण्याशी काही घेणंदेणं नसतं. परंतु तरीही ते उठतात. कोणासाठी तर आपल्यासाठी. ही आपल्यासाठी सकाळी उठण्याची त्यांची सवय म्हणजे त्यांना आपण दिलेला दंडच असतो. त्यांचा कोणताही दोष नसतांना. म्हणूनच शाळेच्या वेळा बदलायलाच हव्यात. शिवाय त्यांच्यातही आपल्यासाठी उठण्यामुळे आजाराची चुणूक लागत असते.

सहाव्या कारणात आपले म्हातारे आजी आजोबा. ज्यांना निवांत झोप हवी असते सकाळी. परंतु आपण जेव्हा उठतो ना. तेव्हा आपण काही चूप बसत नाही. सतत बडबड व गोंगाट करीत असतो. ज्या गोंगाटानं आपले आजीआजोबा अस्वस्थ होतात व ते दिवसभर चीडचीड करीत असतात.सातवं कारण म्हणजे आपल्या सकाळी उठण्यानं आपला अख्खा दिवस त्रासात जात असतो. दिवसभर सतत झोपच आपल्याला सतावत असते. शाळेतही आपण गेलो तरी तिथंही झोप सतावते. कसंतरी मारुनमुकटून आपल्याला जावं लागते शाळेत. महत्वपुर्ण बाब ही की सकाळी उठणे ही आपल्यासाठी सरकारनं दिलेली शिक्षाच वाटते नव्हे तर हा आपल्यावर झालेला अन्यायच वाटतो. हा अन्याय सकाळी शाळा असल्यामुळे होत असतो. म्हणूनच शाळेच्या वेळा बदलायला हव्यात.या झाल्या सकाळी उठण्याबाबत व सकाळी शाळा असण्याबाबतचे मुद्दे. परंतु सकाळी जर शाळा असली तर कोणकोणते फायदे होतात. ते जाणून घेवूया.

# श्री मंगलनाथ मल्टीस्टेटला 'ग्रीन को-२०२५' पुरस्कार जाहीर; सहकार क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याची दखल



**आत्ताच एक्सप्रेस**
**माजलगाव / प्रतिनिधी/ शेख हमीद/** माजलगाव शहरासाठी अभिमानास्पद ठरणारी बातमी असून, सहकार क्षेत्रातील उत्कृष्ट व लोकाभिमुख कार्याबद्दल माजलगाव येथील श्री मंगलनाथ मल्टीस्टेट या संस्थेला 'ग्रीन को-२०२५' पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे.

जागतिक सहकार वर्षानिमित्त सहकार क्षेत्रातील प्रगत अनुभव, विद्यमान आव्हाने आणि भविष्यातील दिशा यावर सखोल मंथन घडवून आणण्यासाठी ग्रीन वर्ल्ड आणि कॉसमॉस को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड यांच्या संयुक्त विद्यमाने 'सहकार मंथन २०२५' या राज्यस्तरीय कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

हा भव्य कार्यक्रम दि. २१ डिसेंबर २०२५ रोजी सहकार सभागृह, विद्यापीठ रोड, शिवाजीनगर, पुणे येथे संपन्न होणार असून, या कार्यक्रमात महाराष्ट्रातील सहकार क्षेत्रातील विविध संस्थांचा सन्मान करण्यात येणार आहे.

याच कार्यक्रमात ग्रीन को-२०२५ या प्रतिष्ठित पुरस्काराने माजलगाव शहरातील श्री मंगलनाथ मल्टीस्टेट संस्थेला गौरविण्यात येणार आहे.

**सहकार मंत्री अतुल सावे यांच्या हस्ते होणार पुरस्कार वितरण**

या कार्यक्रमाचे उद्घाटन महाराष्ट्र राज्याचे अपारंपरिक ऊर्जा व दिव्यांग कल्याण विकास मंत्री अतुल सावे यांच्या हस्ते होणार आहे. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून महाराष्ट्र राज्याचे सहकार आयुक्त डॉ. संजय कोलते, कॉसमॉस को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेडचे अध्यक्ष ड. प्रल्हाद कोकरे, प्रजासक राज्य सहकारी बँक लिमिटेड, मुंबईचे श्री. विद्याधर अनासकर आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत. सहकार क्षेत्रात उल्लेखनीय व नावीन्यपूर्ण कार्य करणाऱ्या मराठवाड्यातील साखर कारखाने, जिनिंग्स तसेच विविध सहकारी संस्था यांचा या कार्यक्रमात सन्मान करण्यात येणार आहे. पारदर्शकता, शाश्वत विकास, सामाजिक बांधिलकी आणि लोकहितकारी उपक्रम या निकषांवर आधारित हा पुरस्कार प्रदान केला जातो.

श्री मंगलनाथ मल्टीस्टेट संस्थेचे संस्थापक अध्यक्ष आर. जी. कानडे आणि व्यवस्थापकीय संचालक ड. रविंद्र कानडे यांनी या पुरस्काराबाबत प्रतिक्रिया व्यक्त करताना सांगितले की, संस्थेच्या पारदर्शक आर्थिक व्यवहारांमुळे, वेळेवर कर्जवाटप व वसुली, ठेवीदारांचा विश्वास संपादन, स्वयंरोजगार निर्मिती, महिला व युवक सक्षमीकरण तसेच विविध सामाजिक उपक्रमांमधील सक्रिय सहभाग याची दखल घेत संस्थेला हा मानाचा पुरस्कार प्रदान करण्यात येत आहे.ते पुढे म्हणाले की, श्री मंगलनाथ मल्टीस्टेटची सातत्यपूर्ण, लोकाभिमुख व विश्वासार्ह कामगिरी हीच या पुरस्काराची खरी पोचपावती आहे. या सन्मानामुळे माजलगाव शहराचे नाव राज्यपातळीवर उज्वल झाले असून, संस्थेच्या कार्याला नव्या ऊर्जा व प्रेरणा मिळणार आहे.

हा पुरस्कार संस्थेचे हितचिंतक, सभासद, ठेवीदार तसेच सर्व कर्मचारीवर्ग यांच्या सामूहिक प्रयत्नांचे व निष्ठावंत परिश्रमांचे फलित असल्याचे नमूद करत, हा सन्मान सर्वांना समर्पित करण्यात येत असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

# काँग्रेसच्या माजी आमदार प्रज्ञा सातव आणि सोलापूर दक्षिणच्या माजी आमदार दिलीप माने यांनी शेकडो समर्थकांसह भाजपात प्रवेश

**आत्ताच एक्सप्रेस**
**मुंबई / प्रतिनिधी/** हिंगोली जिल्ह्यातील राजकीय वातावरणात महत्त्वाचा बदल घडून आला असून काँग्रेसच्या माजी आमदार प्रज्ञा सातव आणि सोलापूर दक्षिणच्या माजी आमदार दिलीप माने यांनी आपल्या शेकडो समर्थकांसह भारतीय जनता पार्टीत प्रवेश केला. हा पक्षप्रवेश गुरुवारी भाजपा प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण आणि महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या उपस्थितीत भाजपाच्या प्रदेश कार्यालयात संपन्न झाला. कार्यक्रमात आ. सचिन कल्याणशेट्टी, ज्येष्ठ नेते कृपाशंकर सिंह, मुख्यालय प्रभारी रविंद्र अनासपुरे, भाजपा माध्यम विभाग प्रमुख नवनाथ बन आदींची उपस्थिती होती, ज्यामुळे कार्यक्रमाची गंभीरता आणि महत्व अधोरेखित झाली.

भाजपा प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी स्वागत करताना सांगितले की, प्रज्ञा सातव आणि दिलीप माने यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली चालू असलेल्या विकासकार्याला हातभार लावण्याच्या उद्देशाने हा निर्णय घेतला आहे. त्यांनी हेही नमूद केले की, या दोघांच्या विश्वासाचे आणि इमानदारीचे भान भाजपात कायम राखले जाईल. श्री. चव्हाण यांनी स्व. राजीव सातव यांच्या योगदानाची आठवण करून दिली आणि त्यांच्या समाजकार्यातील वारसा प्रज्ञा सातव पुढे नेत असल्याबद्दल अभिमान व्यक्त केला.

महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी प्रज्ञा सातव यांच्या सामाजिक कार्याची प्रशंसा करत सांगितले की, स्व. राजीव सातव यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी दोन दशकांहून अधिक काळ समाजसेवा केली आहे. भाजपात प्रवेश करून त्या हिंगोलीच्या विकासात सक्रिय योगदान देतील. त्यांनी हेही स्पष्ट केले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हिंगोलीसह संपूर्ण महाराष्ट्राच्या विकासासाठी सातत्याने प्रयत्नशील आहेत आणि स्व. राजीव सातव यांच्या अपूर्ण कामांचे पूर्णत्व साधण्यासाठी भाजपा त्यांच्या पाठीशी ठामपणे उभी राहील.प्रज्ञा सातव यांनी व्यक्त केले की, स्व. राजीव सातव यांनी हिंगोली जिल्ह्यासाठी केलेले अथक प्रयत्न आणि प्रगतीसाठी केलेली झगडणे मला प्रेरणा देत आहे. त्यांचे अपूर्ण राहिलेले स्वप्न पूर्ण करण्यासाठी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली हिंगोलीच्या विकासासाठी माझे प्रयत्न सुरू ठेवण्यासाठी मी भाजपा मध्ये प्रवेश करत आहे.




दिलीप माने यांनी सांगितले की, भाजपाची विचारसरणी आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली चालू असलेले विकासकार्य हे प्रेरणादायी असून माझ्या समर्थकांसह मी भाजपात प्रवेश करत आहे. त्यांनी आपल्या समर्थकांसोबत काम करत भाजपाची विचारधारा तळागाळापर्यंत पोहोचवण्याचा निर्धार व्यक्त केला. पक्षप्रवेशाच्या कार्यक्रमात प्रज्ञा सातव यांच्या सोबत हिंगोली येथील काँग्रेसचे जिल्हा परिषद माजी सदस्य शिवाजीराव मस्के, जिल्हा प्रवक्ता तथा उपाध्यक्ष विलास गोरे, कळमनुरीचे तालुकाध्यक्ष भागवत चव्हाण, माजी जिल्हा परिषद सदस्य आणि औंढा नागनाथचे तालुकाध्यक्ष पंकज जाधव, खेर्डा गावचे सरपंच पंजाबराव गडदे, काँग्रेसचे जिल्हा उपाध्यक्ष नामदेवराव चव्हाण यांचा समावेश होता.दिलीप माने यांच्या सोबत भाजपात प्रवेश करणाऱ्यांमध्ये सोलापूरचे माजी नगरसेवक जयकुमार माने, नागेश ताकमोगे, दादाराव ताकमोगे, बाजार समितीचे संचालक प्रथमेश पाटील, माने बँकेचे संचालक आनंद देटे आणि काँग्रेसचे युवा अध्यक्ष पृथ्वीराज माने यांचा समावेश होता. या प्रवेशामुळे दोन्ही जिल्ह्यांतील राजकीय समीकरण बदलण्याची शक्यता आहे आणि भाजपाच्या प्रदेशातील वाढीला नवे बळ मिळाले आहे.

हा कार्यक्रम राजकीय दृष्ट्या फक्त पक्षप्रवेश नाही, तर हिंगोली व सोलापूर जिल्ह्यातील विकासकार्याला गती देण्यासाठी आणि स्व. राजीव सातव यांच्या विचारसरणीला पुढे नेण्यासाठी एक महत्त्वाचा टप्पा ठरला आहे. या निर्णयामुळे आगामी निवडणुकांमध्ये राजकीय समीकरणावर आणि मतदारांच्या भावनांवर मोठा परिणाम होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

# तरुणांना शिक्षणापासून वंचित ठेवल्यास त्या देशाला गुलामगिरीकडे नेता येऊ शकते

निसर्गाने माणसाला शक्ति बरोबर युक्तीचे वरदान दिले आहे. कुठे कशी वापरावी ही त्याने त्याने ठरवावी.म्हणूनच शक्तीपेक्षा युक्ती नेहमीच श्रेष्ठ मानली जाते.भट ब्राह्मण पुजारी देवाच्या नांवावर पोट भरून संपती गोळा करतो.तर शेतकरी शेतमजूर शेतीवर कष्टाची कामे करून पोट भरतो. शेती हेच संपती असते.उत्पन्नातून संपती निर्माण होणे ही निसर्गाच्या आणि व्यापाऱ्याच्या मर्जीवर अवलंबून असते.देशात सध्या शिक्षणाचे व आरोग्याचे खासगीकरण करण्यात आले त्यामुळे देशातील नागरिकाचा विनाश अटळ आहे.म्हणजेच देशाचा विनाश अटळ आहे.कारण माणूस जगण्या लायक नसेल तर त्याचे काय होईल?.

हत्ती मानवापेक्षा कितीही ताकदवान असला,घोडा किती चपळ व मजबूत असला आणि बैल ताकदवान असून भली मोठी बैलगाडी ओढत असला तरी यांच्या ताकदीपुढे मानवाची युक्ती श्रेष्ठ असल्यामुळे त्यांना आपल्या ताब्यात ठेवण्याची (गुलाम बनविण्याची) किमया मानवाने साध्य केली आहे.म्हणूनच म्हणतात एखाद्या देशाला युध्द करुन पराजित करण्यापेक्षा डोके वापरून तेथील जनतेला फुकटच्या अन्नधान्याची सवय लावून आणि शिक्षणापासून वंचित ठेवल्यास त्या देशाला गुलामगिरीकडे नेता येऊ शकते.

सध्या भारताची आणि महाराष्ट्रासह सर्वच राज्याची वाटचाल गुलामगिरीच्या दिशेने सुरु झाली आहे.सध्याचे सरकार हे जनतेचे सरकार नसून भांडवल व्यापाऱ्यांचे सरकार आहे.एकीकडे मराठा,धनगर आणि ओबीसींना आरक्षणाचे गाजर दाखवायचे आणि दुसरीकडे सरकारी नोकरी बंद करुन खाजगी ठेकेदारांकडून कंत्राटी कामगार नोकर भरती करायची.तसेच णझडउ विद्यार्थ्यांच्या मेहनतीवर पाणी फिरुन सचिव पदांच्या खाजगी भरती करायच्या. त्याचबरोबर सर्व सरकारी शाळांचे खाजगीकरण करुन सरकार शिक्षणाचा हक्क कायद्याला फाट्यावर मारुन मुलांना मोफत आणि सक्तीचे शिक्षण देण्यापासून पळ काढत आहे.ही अतिशय धक्कादायक बाब असून म्हणून देशाची वाटचाल गुलामगिरीच्या दिशेने सुरु झाली आहे.

विद्यार्थी आणि तरुण हे देशाचे भविष्य मानले जाते.म्हणून भारतीय राज्यघटनेच्या कलम ४५ नुसार १४ वर्षा खालील प्रत्येक मुला/मुलींना मोफत आणि सक्तीचे शिक्षण देणे हे केंद्र आणि राज्य सरकारला बंधनकारक आहे. शिक्षण हक्क कायदा २००९ नुसार शिक्षण मिळणे हा बालकांचा मूलभूत अधिकार आहे. स्वतःला विश्वगुरु म्हणणाऱ्याच्या देशात ८० टक्के जनता ही गरीब आहे. या गरीब जनतेची मुले सरकारी शाळेत शिक्षण घेत आहेत. शिक्षण हे वाघिणीचे दुध आहे, हे दुध जो प्राशन करतो तो गुरगुरल्याशिवाय राहत नाही. असे विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर म्हणतात. शिक्षणाचे महत्व जाणून महात्मा ज्योतिबा फुले आणि सावित्रीबाई फुले यांनी ब्राम्हण समाजाचा त्रास सहन करुन त्यावेळी मुला/मुलींना शिक्षण दिले.कर्मवीर भाऊराव पाटील यांनीही शिक्षणाला महत्व दिले होते.त्यांनी तर रयत शिक्षण संस्थेची स्थापना केली होती. कमवा आणि शिका या तत्वज्ञानाची सुरुवात करुन त्यांनी मागास जाती आणि अल्प उत्पन्न असलेल्या लोकांना शिक्षित करण्यात महत्त्वाची भूमिका बजावली. छत्रपती शाहु महाराज यांनीही शिक्षणाला महत्व दिले. शिक्षण ही जीवन जगण्याची गुरूकिल्ली आहे. जीवन म्हणजे काय? जीवन का आणि कसे जगावे? जीवनाची सार्थकता कशात आहे?

जीवन पूर्ण कसे करावे? आपण जीवनातून काय घ्यावे आणि इतरांना काय द्यावे, या सर्व प्रश्नांची उत्तरे म्हणजेच शिक्षण होय. शिक्षणामुळे माणूस हुशार होत असून गुलामगिरीच्या बेड्या तो झूगारू शकतो. म्हणून पूर्वीच्या काळी ब्राम्हण व्यतिरिक्त कोणत्याही बहुजन मुलांना शिक्षण घेण्यास बंदी होती.(बहुजन म्हणजे शुद्र नसून बारा बलुतेदार,अठरा पगड जाती तसेच ब्राम्हण सोडून सर्व जाती म्हणजेच हिंदू समाज होय.हल्लीच्या लोकांना गर्वसे कहो हिंदू है समजते पण बहुजन या शब्दाचा अर्थ कळत नाही.) मात्र,हल्लीची बहुसंख्य हिंदूची मुले (बहुजनांची मुले) शिक्षण घेऊन पुढे जात असल्यामुळे नोकरी आणि शिक्षणात खाजगीकरण करुन बहुसंख्ये हिंदूच्या (बहुजनांच्या) मुळावरच घाव घातला जात आहे.म्हणजेच शाळेचे खाजगीकरण; देशाचा विनाश अटळ!

सरकारने नुकतेच सरकारी जिल्हापरिषद ६२ हजार शाळांचे खाजगीकरण करण्याचा जी.आर. काढला आहे. व्यापाऱ्यांनी ठराविक पैसे देऊन शाळेला आपले नाव देणे.ती शाळा चालविणेची जबाबदारी घेणे.त्यांच्या पैशातून शाळांची सुधारणा करुन दर्जेदार शिक्षण देणे ही सरकारची योजना आहे.

परंतु,ही योजना वरवर जरी चांगली दिसत असली तरी गरीब मुलांना शिक्षणापासुन वंचित ठेवण्याचे खतरनाक षडयंत्र आहे.सुरवातीला जिओ ने फ्री सिमकार्ड वाटले आणि त्यानंतर कसे रिचार्ज वाढवित गेले हे आपण पाहतच आहोत. त्यानुसारच सुरवातीला चांगले शिक्षण द्यायचे आणि मग नंतर परवडत नाही असे बोलून त्याच सरकारी शाळेचे खाजगी शाळेत रूपांतर करुन मोठ्ठाली फी उकळायची.आणि मग गरिबांकडे पैसे नाही म्हणून त्यांनी शाळेत येणे बंद केल्यावर तीच अशिक्षित मुले प्रथम व्यसनाकडे वळतील,मग ते व्यसन पूर्ण करण्यासाठी गुन्हेगारीकडे वळतील किंवा गुलामगिरी पत्करतील.त्यानंतर पुढे गुलामांच्या पिढ्या जन्माला येतील.

देशाला खरच विश्वातील महान देश बनवायचे असेल तर प्रथम मोफत आणि सक्तीच्या शिक्षणाबरोबरच आरोग्य सुविधाही मोफत पुरवायला हव्यात.अन्नधान्य,विज आणि इतर काहीही मोफत देण्यापेक्षा शिक्षण आणि आरोग्य मोफत दिल्यास देशातील प्रत्येक व्यक्ती सक्षम होईल.त्याला फुकटच्या गोष्टींची गरजच भासणार नाही.१४० कोटी लोकसंख्या असलेल्या देशात बुध्दीजीव जमात तयार होईल.त्यामुळे तंत्रज्ञानाच्या बाबतीत जगात फक्त भारताचाच डंका वाजेल.भारताचा रूपया जगावर राज्य करेल. पाकिस्तान,चीन तर सोडाच जगातील एकही देश वाकड्या नजरेने भारताकडे बघण्याची हिंम्मत करणार नाही.नुसती स्वतःच विश्वगुरु असल्याची छाती ठोकून काहीच फायदा नाही.यासाठी जगाने तुम्हाला विश्वगुरु मानले पाहिजे. सध्या देशात आणि महाराष्ट्रात जे चालले आहे ते वाईट आहे.यावर आवाज उठविणे अत्यंत गरजेचे आहे.शाळांचे खाजगीकरण करतानाच शिक्षकांनाही देशोधडीला लावण्याचे षडयंत्र आहे. इतर खाजगी शाळा लाखोंची फी घेऊन दर्जेदार शिक्षण देतात.मात्र,सरकारी शाळेचे खाजगीकरण केल्यानंतर कमी वेतनात शिक्षकांची नेमणूक केली जाईल.मग तो आर्थिक विवंचनेत असलेला शिक्षक काय खाक विद्यार्थ्यांना शिकविणार? म्हणून प्रथम शिक्षकांनी संघटित होऊन रस्त्यावर उतरले पाहिजे.रस्त्यावर उतरतांना समाजातील प्रत्येक घटकांना याचे गांभीर्य निदर्शनास आणुन दिले पाहिजे.त्यासाठी सामाजिक बांधिलकी ठेऊन प्रबोधन करण्याची तयारी असली पाहिजे.तरच त्यांनाही आंदोलनात सहभागी करुन एकव्यापक जन आंदोलन उभे करता येईल.हे प्रथम लक्षात घ्यावे लागेल.

देशाच्या उज्वल व वैभवशाली भविष्यासाठी समाजातील सर्वच घटकांनी, विद्यार्थ्यांनी,नागरिकांनी,शिक्षकांनी एकत्रित येऊन शिक्षणांच्या खाजगीकरणाला सर्वच मार्गानी एकत्रित येऊन लढा देणे अत्यंत आवश्यक व गरजेचे आहे. तरच सरकार नमेल.अन्यथा असंघटित कष्टकरी कामगार मंजुरांच्या गुलामगिरी पत्करून गुलामांच्या पिढ्या तयार होतील हे लक्षात घ्यावे!. म्हणूनच लिहतो तरुणांना शिक्षणापासून वंचित ठेवल्यास त्या देशाला गुलामगिरीकडे नेता येऊ शकते.सदरील लेख पूर्ण वाचून आपल्या कडील सर्वच विद्यार्थी व पालक यांनी समाजात जनजागृती करावी हि नम्रतेने आग्रहाची विनंती

एक सत्यशोधक विद्यार्थी व पालक
**-सागर रामभाऊ तायडे.**
**,भांडुप मुंबई.**

# 'इथेच टाका तंबू' नाटकाची मुंबईतील राष्ट्रीय 'नाट्यरतन' महोत्सवासाठी निवड

**आत्ताच एक्सप्रेस**
**नाशिक (प्रतिनिधी)** यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या ललित कला केंद्राने निर्मिती केलेल्या 'इथेच टाका तंबू' या दोन अंकी प्रायोगिक नाटकाची मुंबई येथे होणाऱ्या 'नाट्यरतन' बहुभाषिक राष्ट्रीय नाट्यमहोत्सवासाठी निवड झाली आहे. पद्मविभूषण रतन टाटा यांच्या स्मरणार्थ आयोजित करण्यात येणारा हा महोत्सव २५ ते २८ डिसेंबर २०२५ या कालावधीत होणार आहे.हे नाटक शनिवार, २७ डिसेंबर २०२५ रोजी सकाळी ११.३० वाजता माटुंगा येथील यशवंत नाट्यमंदिरात सादर केले जाणार आहे. नाटकाचे लेखन प्रा. दत्ता पाटील यांचे असून दिग्दर्शन श्री. सचिन शिंदे यांनी केले आहे.विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना वाव देणे, शास्त्रोक्त प्रशिक्षण व व्यासपीठ उपलब्ध करून देणे या उद्देशाने विद्यापीठाने ललित कला केंद्राची स्थापना केली आहे. त्याच अनुषंगाने नाट्यशास्त्र अभ्यासक्रमातील आजी-माजी विद्यार्थ्यांना नामांकित कलावंतांच्या मार्गदर्शनाखाली प्रत्यक्ष रंगभूमीचा अनुभव मिळावा, या हेतूने या नाटकाची निर्मिती करण्यात आली आहे. नाट्यरतन महोत्सवात महाराष्ट्र व महाराष्ट्राबाहेरील एकूण १२ हिंदी, मराठी व इंग्रजी नाटके सादर होणार आहेत.पाटील-शिंदे जोडीचे नवे सामाजिक प्रायोगिक नाटक

लेखक प्रा. दत्ता पाटील व दिग्दर्शक सचिन शिंदे यांची हंडाभर चांदण्या, तो राजहंस एक, कलगीतुरा, दगड आणि माती, गढीवरच्या पोरी यांसारखी अनेक नाटके राज्यात व राज्याबाहेर गाजली आहेत. 'इथेच टाका तंबू' हे नाटक वेगळा सामाजिक विषय मांडणारे असून त्यात ओंकार गोवर्धन, अमेय बर्वे, अश्विनी कासार व उमेश जगताप यांच्या भूमिका आहेत.नेपथ्य, पार्श्वसंगीत, प्रकाशयोजना, रंगमंच व्यवस्था यांसह नाटकाच्या विविध तांत्रिक बाजू विद्यापीठाच्या नाट्यशास्त्राच्या आजी-माजी विद्यार्थ्यांनी तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली सांभाळल्या आहेत.या नाटकाचा नाशिकमधील प्रयोग रविवार, २८ डिसेंबर २०२५ रोजी दुपारी १२.३० वाजता महाकवी कालिदास कलामंदिर येथे होणार आहे.

नाट्यरतन महोत्सवासाठी नाटकाची निवड झाल्याबद्दल विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे यांनी समाधान व्यक्त करून ललित कला केंद्राचे अभिनंदन केले आहे. हे नाटक विद्यापीठाच्या नाट्यविषयक शिक्षणक्रमाला चालना देणारे असून विद्यापीठाच्या नावलौकिकात भर घालणारे असल्याचे त्यांनी नमूद केले.ललित कला केंद्राच्या माध्यमातून भविष्यात नाटक, लोककला, संगीत व नृत्य क्षेत्रात विद्यार्थ्यांना भक्कम व्यासपीठ उपलब्ध करून देण्याचा विद्यापीठाचा मानस आहे. ही ललित कला केंद्राची पहिलीच नाट्यनिर्मिती असून लेखक, दिग्दर्शक व कलाकारांना स्पर्धात्मक रंगभूमीवर प्रत्यक्ष अनुभव घेण्याची मोठी संधी मिळणार आहे, असेही कुलगुरूंनी स्पष्ट केले.
- प्रा. संजीव सोनवणे, कुलगुरू

## संक्षिप्त

### जिल्हाधिकारी कार्यालयात अल्पसंख्याक हक्क दिवस साजरा



**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी)** येथील जिल्हाधिकारी कार्यालयात अल्पसंख्याक हक्क दिवस साजरा करण्यात आला. जिल्हा नियोजन अधिकारी तथा जिल्हा अल्पसंख्याक अधिकारी कार्यालयामार्फत या विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

अध्यक्षस्थानी आयुक्त, अल्पसंख्याक विभाग श्रीमती प्रतिभा इंगळे होत्या. निवासी उपजिल्हाधिकारी जनार्दन विधाते, उपजिल्हाधिकारी संगीता राठोड, तसेच अब्दुल वाजिद कादरी, सरबजीत सिंग, शहापूर दोरडी, महावीर पाटणी, वसीम शेख, डॉ. अहमद शरीफ देशमुख आदी उपस्थित होते.अल्पसंख्यकांच्या कायदेशीर व घटनात्मक हक्कांबाबत सविस्तर मार्गदर्शन डॉ. फिरदोज फातिमा यांनी केले. महिला जागृती व अल्पसंख्याक हक्कांची जाणीव याविषयी श्रीमती अर्पिता शरद यांनी माहिती दिली. त्यानंतर अल्पसंख्याकांसाठी राबविण्यात येणाऱ्या विविध शासकीय योजना तसेच मार्टीबाबतची माहिती पठाण अजहर जब्बार यांनी सादर केली.कार्यक्रमात महावीर पाटणी, सरबजीत सिंग, अब्दुल वाजिद कादरी, झिया सर, राज्य अल्पसंख्याक आयोगाचे सदस्य श्री. वसीम शेख तसेच काझी कल्लीमुल्ला सिध्दीकी यांनी अल्पसंख्याक हक्क दिनाच्या निमित्ताने कायदेशीर व घटनात्मक हक्क, केंद्र व राज्य शासनाच्या योजना तसेच जनजागृतीचे महत्त्व यावर मार्गदर्शन केले. श्रीमती प्रतिभा इंगळे यांनी अध्यक्षीय समारोप केला.सहा. जिल्हा नियोजन अधिकारी राजू भिंगारे यांनी आभार मानले.

### वैजापूर येथील स्ट्रॉंगरूमची जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी केली पाहणी



**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी)** वैजापूर येथील नगर परिषद निवडणुकीच्या मतपेट्यांची सुरक्षितता आणि मतमोजणी प्रक्रियेबाबत तयारी यासाठी जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी मतपेट्यांच्या स्ट्रॉंगरूमची पाहणी केली.यावेळी त्यांनी प्रशासन, पोलिस यंत्रणा व निवडणूक कर्मचाऱ्यांना मतमोजणीच्या दिवशी कोणताही गैरप्रकार घडू नये, यासाठी आवश्यक ती सर्व दक्षता घेण्याच्या सूचना दिल्या. मतमोजणी प्रक्रिया पूर्णपणे पारदर्शक, सुरळीत आणि कायद्याच्या चौकटीत पार पाडावी, असे निर्देश जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी दिले.स्ट्रॉंगरूमची सुरक्षा व्यवस्था, सीसीटीव्ही कॅमेरे, प्रवेश-नियंत्रण तसेच कर्मचारी तैनातीची तपासणी केली.मतमोजणीदरम्यान प्रत्येक टेबलवरील कामकाज ऑन-कॅमेऱ्यावर रेकॉर्ड करण्याच्या सूचना दिल्या. यामुळे संपूर्ण प्रक्रिया पारदर्शक राहणार आहे. याशिवाय माध्यम प्रतिनिधींसाठी स्वतंत्र कक्ष उभारण्याचे निर्देश देण्यात आले. मतमोजणीदरम्यान कोणत्याही उमेदवार किंवा प्रतिनिधींनी आक्षेप नोंदविल्यास ते शांततेत, नियमांनुसार आणि तत्काळ सोडवावेत, असेही जिल्हाधिकाऱ्यांनी स्पष्ट केले. यावेळी वैजापूर नगरपालिकाचे मुख्याधिकारी भागवत बिघोत, उपविभागीय अधिकारी अरुण जऱ्हाड, तहसीलदार नवनाथ वागवाड, उपस्थित होते.

# विजेच्या लपंडावामुळे पिशोर परिसरातील शेतकरी प्रचंड त्रस्त; रब्बी पिकांवर संकट

**आत्ताच एक्सप्रेस**

**पिशोर (प्रतिनिधी)** परिसरातील शेतकरी सध्या विजेच्या सततच्या लपंडावामुळे मोठ्या अडचणीत सापडले आहेत. महावितरणच्या ढिसाळ व निष्काळजी कारभारामुळे रब्बी हंगामातील पिकांना वेळेवर पाणी देता येत नसल्याने शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान होण्याची भीती निर्माण झाली आहे. गेल्या आठ-दहा दिवसांपासून वीजपुरवठा अत्यंत अनियमित असून, कधी अचानक बंद तर कधी वारंवार खंडित होत असल्याने शेतकऱ्यांची चांगलीच फरफट होत आहे.शेतकरी अजय काकासाहेब निकम (नादरपूर) यांनी सांगितले की, पिशोर विद्युत महावितरण कार्यालयात फोन केला असता बहुतांश वेळा लाईनमन फोन उचलत नाही. कधी उचललाच तर ऑफिसला कॉल करा असे सांगितले जाते. कार्यालयात फोन केल्यावर फॉल्ट झाला आहे, ट्रीप झाली आहे, थोड्या वेळात लाईन येईल अशी उडवाउडवीची उत्तरे दिली जातात. मात्र इतर परिसरात वीजपुरवठा सुरळीत असताना फक्त शेतकऱ्यांच्या लाईनमध्येच हा सततचा गोंधळ का, असा सवाल शेतकरी उपस्थित करत आहेत.

कन्नड ग्रामीण प्रतिनिधी सुनील निकम यांनी दिलेल्या माहितीनुसार, पिशोर परिसरात महावितरणकडून सोमवारपासून रोज रात्री दोन वाजेपासून सकाळी सहा वाजेपर्यंत वीजपुरवठ्याचे नियोजन असल्याचे सांगितले जाते. मात्र प्रत्यक्षात या वेळेतही दोन ते चार तास वीज बंद ठेवली जाते. विशेष म्हणजे १५ डिसेंबर २०२५ पासून ही समस्या अधिक तीव्र झाली असून, दर दहा ते पंधरा मिनिटांनी वीज खंडित होत असल्याने शेतीपंप चालू ठेवणे अशक्य झाले आहे. सध्या रब्बी हंगाम सुरू होऊन जवळपास महिना उलटला आहे. गहू, हरभरा, ज्वारी, कांदा यांसारख्या पिकांची पेरणी शेतकऱ्यांनी केली असून, या पिकांना ठराविक अंतराने पाणी देणे अत्यंत गरजेचे असते. अनेक शेतकऱ्यांच्या विहिरींमध्ये मुबलक पाणी असूनही वीज नसल्याने ते पाणी पिकांपर्यंत पोहोचवू शकत नाहीत. परिणामी पिके करपण्याच्या मार्गावर आहेत.

या परिसरात अनेक शेतकरी सामायिक विहिरींवर अवलंबून आहेत. त्यामुळे पाळीनुसार विद्युत पंप चालवावा लागतो. एखाद्या शेतकऱ्याच्या पाळीत वीजच उपलब्ध नसेल तर त्याला पुढील पाळी येईपर्यंत – म्हणजे दहा ते बारा दिवस – थांबावे लागते. तोपर्यंत पिके पाण्याविना सुकून जातात. यामुळे शेतकऱ्यांमध्ये आपापसात वाद, भांडणे होत असल्याचेही चित्र दिसून येत आहे.



एकीकडे यावर्षी झालेल्या अतिवृष्टीमुळे खरीप हंगामातील पिकांचे मोठे नुकसान झाले. त्यामुळे आधीच आर्थिक अडचणीत सापडलेला शेतकरी रब्बी हंगामावर मोठ्या आशेने अवलंबून होता. मात्र आता विजेच्या अनियमित पुरवठ्यामुळे रब्बीची पिके तरी हातात येतील का, अशी भीती शेतकऱ्यांच्या मनात निर्माण झाली आहे. जगाचा पोशिंदा म्हणून ओळखल्या जाणाऱ्या शेतकऱ्याची परिस्थिती सध्या अत्यंत बिकट बनली आहे.महावितरण कार्यालयाकडून वारंवार फॉल्ट, ट्रीप अशी कारणे सांगून दुर्लक्ष केले जात असल्याचा आरोप शेतकऱ्यांनी केला आहे. संबंधित अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष पाहणी करून तांत्रिक अडचणी दूर कराव्यात, तसेच शेतकऱ्यांसाठी जाहीर केलेल्या वेळापत्रकानुसार सुरळीत वीजपुरवठा करावा, अशी जोरदार मागणी परिसरातील शेतकरी करत आहेत. प्रशासनाने तातडीने लक्ष न दिल्यास आंदोलनाचा इशाराही काही शेतकऱ्यांनी दिला आहे.

## जय भवानी विद्या मंदिरात क्रीडा महोत्सवाचा उत्साहात समारोप

**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी)** जय भवानी विद्या मंदिर व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने शाळेत आयोजित वार्षिक क्रीडा महोत्सवाचा उत्साहात समारोप करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जय तुळजाभवानी शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष मा. डॉ. नामदेवराव गाडेकर होते. प्रमुख अतिथी म्हणून जिल्हा क्रीडा अधिकारी डॉ. रेखा परदेशी, श्री. खंडू यादवराव उपस्थित होते.

यावेळी संस्थेचे सचिव श्री. रंगनाथराव जाधव, संस्थेचे सदस्य श्री. शिवाजीराव देवरे, प्रशालेचे मुख्याध्यापक डॉ. अरुण कांबळे, उपमुख्याध्यापिका सौ. मनीषा रांजणीकर, पर्यवेक्षिका सौ. सुनीता मोरे आदी मान्यवर उपस्थित होते.प्रसंगी अध्यक्ष मा. डॉ. नामदेवराव गाडेकर, सचिव श्री. रंगनाथराव जाधव व क्रीडा अधिकारी डॉ. रेखा परदेशी यांनी विद्यार्थ्यांना आरोग्य व क्रीडांचे महत्त्व याविषयी मार्गदर्शन केले.

कबड्डी, खो-खो, व्हॉलीबॉल, रस्सीखेच, १०० मीटर धावणे, संगीत खुर्ची, स्लो सायकल, लंगडी आदी





विविध स्पर्धांमध्ये यश संपादन करणाऱ्या खेळाडूंना प्रमाणपत्रे व बक्षिसांचे वितरण करण्यात आले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. सुहास अंबेकर यांनी केले, तर आभार प्रदर्शन मुख्याध्यापक डॉ. अरुण कांबळे यांनी केले. कार्यक्रमास शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. तसेच मा. बाजीराव देसाई, जिल्हा क्रीडा अधिकारी, छत्रपती संभाजीनगर यांनी विजयी खेळाडूंना शुभेच्छा दिल्या.

## हिंगोली व सोलापूरमधील माजी काँग्रेस नेते भाजपात प्रवेश

**आत्ताच एक्सप्रेस/मुंबई (प्रतिनिधी)** हिंगोलीचे माजी आमदार प्रज्ञा सातव आणि सोलापूर दक्षिणचे माजी आमदार दिलीप माने यांनी शेकडो समर्थकांसह भारतीय जनता पार्टी (भाजपा) मध्ये प्रवेश केला. भाजपाचे प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण आणि महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी यावेळी सर्वांचे स्वागत केले.भाजपात प्रवेश करताना प्रज्ञा सातव म्हणाल्या की, त्यांनी स्व. राजीव सातव यांचा हिंगोली विकासासाठी केलेला वारसा पुढे नेण्यासाठी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या विकास कार्यात साथ देण्यासाठी हा निर्णय घेतला आहे.दिलीप माने म्हणाले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली चालणाऱ्या विकास आणि भाजपाच्या विचारसरणीने त्यांना प्रेरित केले.यावेळी अनेक माजी काँग्रेस नेते व स्थानिक पदाधिकारी देखील भाजपात प्रवेश करीत आहेत, ज्यामध्ये हिंगोली जिल्हा परिषद माजी सदस्य शिवाजीराव मस्के, विलास गोरे, पंकज जाधव, पंजाबराव गडदे आणि सोलापूरचे जयकुमार माने, प्रथमेश पाटील, पृथ्वीराज माने यांचा समावेश आहे.

## ट्रकच्या धडकेत वृद्धाचा मृत्यू झाला

**आत्ताच एक्सप्रेस**



**वैजापूर (प्रतिनिधी)** शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक परिसरात बुधवारी दुपारी एक दुर्दैवी अपघात घडला. भरधाव ट्रकने एका दुचाकीला धडक दिल्यामुळे ६३ वर्षीय मनसाराम दशरथ आव्हाळे यांचा मृत्यू झाला.

प्राथमिक माहितीनुसार, आव्हाळे यांच्या दुचाकी क्रमांक एम एच ५७ ए ४७५२ ला ट्रक क्रमांक एम एच ०४ एच.डी ६०५५ ने धडक दिली. त्यानंतर आव्हाळे यांना उपस्थितांनी तातडीने शहरातील खासगी रुग्णालयात दाखल केले, जिथून त्यांना उपजिल्हा रुग्णालयात पाठवण्यात आले. दुपारी १ वाजेच्या सुमारास वैद्यकीय अधिकारींनी त्यांना मृत घोषित केले.

घटनेची माहिती मिळताच वैजापूर पोलीस ठाण्याचे भुरे व किरण रावते घटनास्थळी दाखल झाले आणि पंचनामा केला. धडक देणारा ट्रक पोलिसांच्या ताब्यात घेण्यात आला असून प्रकरणाची नोंद वैजापूर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

## मोहसीन अहमद शाळेत अल्पसंख्याक दिनानिमित्त रॅली व कार्यक्रम उत्साहात संपन्न

**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी)** मोहसीन अहमद उर्दू प्राथमिक शाळा, रोशन गेट, छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) येथे अल्पसंख्याक दिनानिमित्त रॅली व जनजागृती कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पडला.या निमित्ताने विद्यार्थ्यांनी रॅली काढत परिसरातील घरोघरी भेटी देऊन अल्पसंख्याकांचे हक्क तसेच शासनाकडून उपलब्ध असलेल्या विविध योजनांबाबत पत्रकांच्या माध्यमातून नागरिकांमध्ये जनजागृती केली.रॅलीनंतर शाळेच्या शिक्षण समितीचे अध्यक्ष व माजी नगरसेवक मोहसीन अहमद यांच्या अध्यक्षतेखाली विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून शाळेच्या सचिव डॉ. शाहीन फातेमा, शाळेचे मुख्याध्यापक खान मोहम्मद यासर तसेच समाजातील मान्यवर सदस्य उपस्थित होते.



यावेळी बोलताना खान मोहम्मद यासर व मोहसीन अहमद यांनी अल्पसंख्याक दिनाचे महत्त्व स्पष्ट केले. अल्पसंख्याक दिन १९९२ पासून साजरा केला जात असून, या माध्यमातून शासनाकडून अल्पसंख्याक समाजासाठी शिक्षण, रोजगार व विविध सरकारी विभागांमध्ये सवलती व सुविधा दिल्या जात असल्याचे त्यांनी सांगितले.

मागील महाराष्ट्र सरकारने अल्पसंख्याकांना शिक्षणात दिलेले ५ टक्के आरक्षण तात्काळ पुनर्संचयित करावे, अशी मागणी मोहसीन अहमद यांनी प्रसारमाध्यमांद्वारे राज्य सरकारकडे केली. अल्पसंख्याक हे देशाचा अविभाज्य घटक असून त्यांना त्यांचे कायदेशीर हक्क वेळेत मिळणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले.यावेळी सच्चर समिती, महमूद-उर-रहमान समिती व रंगनाथ मिश्रा आयोगाच्या अहवालांचा संदर्भ देत या शिफारसींची अंमलबजावणी करण्याची मागणीही करण्यात आली.कार्यक्रमाला शाळेचे शिक्षक, पालक, विद्यार्थी तसेच नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.


## प्रभावी प्रशासनात नागरिकांशी सुसंवाद महत्वाचा - जिल्हाधिकारी दिलीप स्वामी

**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी)** शासकीय कार्यालयात नागरिकांचे विविध कामानिमित्त भेटी होत असतात. प्रभावी प्रशासनासाठी या भेटीदरम्यान नागरिकांचे म्हणणे, तक्रारी ऐकून घेऊन त्यांच्याशी सुसंवाद साधावा, असे आवाहन जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी केले.

वैजापूर येथील विनायकराव पाटील महाविद्यालयाच्या सभागृहात ग्राम महसूल अधिकारी व मंडळ अधिकारी यांच्या एक दिवसीय प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी वैजापूरचे उपविभागीय अधिकारी अरुण जऱ्हाड, तहसीलदार नवनाथ वागवाड, विनायकराव पाटील महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.थोरे, प्रशिक्षणातील मार्गदर्शक संजय कुंडेटकर व वैजापूर तालुक्यातील सर्व ग्राम महसूल अधिकारी व मंडळ अधिकारी यांची उपस्थिती होती.

शासकीय कामकाजा बरोबरच विविध सामाजिक उपक्रमामध्ये सक्रिय सहभाग नोंदवणे ही आवश्यक आहे. याच्या माध्यमातून शासनाच्या विविध योजनांची अंमलबजावणी होत असते. तसेच वाचन, लेखन याचा छंद जोपासला जावा.दैनंदिन सवयी मधूनच सकारात्मक बदल घडत असतो. तो आपल्या स्वतः सह कुटुंब, देश आणि समाजासाठी उपयुक्त ठरतो. प्रशासनात काम करत असताना आपल्या कामाचा आनंद बरोबरच समाजातील लोकांना आनंद मिळाला पाहजे.स्वतःच्या कामाचा अभिमान वाटावा असे एक तरी काम करावे. आपले पद समाजसेवा साठी वापरावे.प्रत्येक घटकातील संवाद हरवत गेला असून.तो प्रवाही पाहिजे, तसेच यात शब्दाचा वापर योग्य करावा. यातून जनतेची तक्रार अडचण किंवा आवश्यक असलेल्या योजनांच्या माहिती, विषयाची पूर्तता करण्यासाठी काम करावे. लोकाभिमुख प्रशासन करण्यात नागरिकांशी सुसंवाद साधावा असे आवाहन जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी मंडल अधिकारी, ग्राम महसूल अधिकारी यांना प्रशिक्षण कार्यक्रमात केले.



संजय कुंडेटकर, यांनी पोलिस पाटील यांची भूमिका, कुटुंब, सेवा, पदाची वर्गवारी विविध पदाची कर्तव्य या विषयी महाराष्ट्र नागरी सेवा, वर्तवणूक, शिस्त, मत्ता व दायित्व याचे लिफाफा बंद विवरण सादर करण्यात यावे. याबांत नियमाचे मार्गदर्शन केले.

जमीनच्या अधिकाराचे हस्तांतर, अनिवार्य घटक. खरेदीखत. मोजणी नकशा, मालमत्ता हस्तांतर करीत असताना मृत्युपत्र यांच्या बाबत नोंदी घेण्यासाठी अवलंब करण्याची कार्यपद्धती याविषयी प्रशिक्षण मार्गदर्शन केले. कुळकायदा, बिगर शेतकरी किंवा शेतमजूर नसलेला व्यक्ती जमीन खरेदी करू शकत नाही. किंवा यास जिल्हाधिकारी यांची परवानगी घ्यावी.अशा विविध महसूल विषयक तसेच सेवा विषयक नियमांची माहिती प्रशिक्षणात दिली.

ताण तणावाचे व्यवस्थापन याविषयी मार्गदर्शन करताना डॉ. थोरे म्हणाले की, आपण आपल्या कामात कमी पडतो त्यामुळे ताण येतो. आपल्या मर्यादा वाढवल्या पाहजे. स्वतः क्षमता विकसित करून क्षमतेनुसार कामाचे सुयोग्य नियोजन केल्यानंतर दैनंदिन जीवनात ताण येत नाही. स्वतःचे कर्तव्य समजून घेतले पाहजे. तसेच स्वतःच्या कामाचे मूल्यमापन करणे आवश्यकआहे.

ज्या गोष्टीसाठी आपला कोणताही संबंध नाही त्याचे ताण घेऊ नये. चुका स्वीकारणे आवश्यक असून त्यामुळे कामात सुधारणा करता येते.यातून स्वतःची ओळख निर्माण करता येते.तसेच

मूळ काम आपले आपण करावे. यात अद्ययावतपणा आणण्यासाठी तंत्रज्ञानाचाही वापर करावा. वेळेनुसार होणारे बदल स्वीकारून काम केले तर ताण तणाव येणार नाही असे डॉ. थोरे यांनी सांगितले.

# दिव्यांग व्यक्तींच्या विवाहास शासनाचे प्रोत्साहन – सचिव तुकाराम मुंढे

**आत्ताच एक्सप्रेस**

**मुंबई / प्रतिनिधी/** दिव्यांग अव्यंग विवाह प्रोत्साहन योजनेत महत्त्वपूर्ण सुधारणा करण्यात आल्या असून, अनुदानाच्या रकमेत वाढ करून योजना अधिक प्रभावी करण्यात आली असल्याचे दिव्यांग कल्याण विभागाचे सचिव तुकाराम मुंढे यांनी सांगितले. समाजात दिव्यांग व्यक्तींच्या विवाहाबाबत असलेले सामाजिक व सांस्कृतिक पूर्वग्रह त्यांच्या आयुष्यावर दीर्घकालीन परिणाम करणारे ठरतात. दिव्यांगत्वाकडे अनेकदा असमर्थता किंवा अधिकारहीनता म्हणून पाहिले जाते. या पार्श्वभूमीवर हा दृष्टिकोन बदलणे आवश्यक असल्याचे अधोरेखित करत, दिव्यांग व्यक्तींच्या विवाहाला प्रोत्साहन देण्यासाठी हा महत्त्वाचा निर्णय शासनाने घेतला आहे.

सचिव मुंढे म्हणाले, दिव्यांग व्यक्तीचा विवाह ही पालकांच्या दृष्टीने जिकिरीची जबाबदारी बनते. अनेकदा विवाह टाळला जातो किंवा विजोड जोडीदार दिला जातो. विशेषतः दिव्यांग महिलांना महिला आणि दिव्यांग अशा दुहेरी भेदभावाला सामोरे जावे लागते. या पार्श्वभूमीवर शासन, सामाजिक व स्वयंसेवी संस्था दिव्यांग व्यक्तींना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी प्रयत्नशील आहेत.

दिव्यांग-अव्यंग विवाह प्रोत्साहन अनुदान योजनेत वाढ करण्यासह दिव्यांग-दिव्यांग विवाह हा नवा घटक समाविष्ट करण्यात आला आहे. नव्या सुधारित योजनेनुसार दिव्यांग-अव्यंग विवाहासाठी रुपये १,५०,००० तर दिव्यांग-दिव्यांग विवाहासाठी रुपये २,५०,००० इतके अनुदान मिळणार आहे. ही रक्कम पती-पत्नीच्या संयुक्त बँक खात्यात थेट लाभहस्तांतरण प्रणालीद्वारे जमा केली जाणार असून, त्यापैकी ५० टक्के रक्कम दाम्पत्याने पाच वर्षांकरिता मुदतठेवीत ठेवणे अनिवार्य असल्याचे सचिव मुंढे यांनी सांगितले.

योजनेच्या प्रमुख अटी

वधू अथवा वर दिव्यांग व्यक्ती अधिनियमाप्रमाणे किमान ४०% अथवा त्यापेक्षा जास्त दिव्यांगत्वाचे आधारसंलग्न वैध वैश्विक ओळखपत्र (यूडीआयडी) धारण आवश्यक आहे. दिव्यांग वधू किंवा वर यापैकी एक महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असावा. विवाहित वधू व वराचा प्रथम विवाह असावा तसेच वधू अथवा वर घटस्फोटीत असल्यास अशा प्रकारची मदत यापूर्वी घेतलेली नसावी.

विवाह हा कायदेशीररित्या विवाह नोंदणी कार्यालयाकडे नोंदविलेला असावा. विवाह झाल्यानंतर एका वर्षाच्या आत त्यांनी या योजनेचा लाभ घेण्यासाठी संबंधित जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण अधिकारी यांचेकडे अर्ज करणे आवश्यक आहे.

अर्जदारांनी आवश्यक कागदपत्रांसह परिपूर्ण अर्ज जिल्हा कार्यालयाकडे सादर करावयाचा आहे. पात्र लाभार्थ्यांची निवड मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांच्या अध्यक्षतेखालील समितीमार्फत करण्यात येईल. मंजूर लाभार्थ्यांची यादी आयुक्त, दिव्यांग कल्याण, पुणे यांच्याकडे पाठवून निधी वितरित केला जाईल.याबाबतचा शासन निर्णय दिव्यांग कल्याण विभागाने निर्गमित केला असून महाराष्ट्र शासनाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

# राज्यातील २१ जिल्ह्यांत सिकलसेल तपासणी विशेष मोहीम - आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर

**आत्ताच एक्सप्रेस**

**मुंबई/ प्रतिनिधी/** सिकलसेल तपासणी विशेष पंधरवडा मोहिमेअंतर्गत राज्यातील सिकलसेल आजाराचे प्रमाण अधिक असलेल्या २१ जिल्ह्यांतील प्रत्येक नागरिकाची सिकलसेल तपासणी झाली पाहिजे.

एकही नागरिक सिकलसेल तपासणीपासून वंचित राहू नये, याची काटेकोर दक्षता घेण्याच्या सूचना सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांनी दिल्या.

आरोग्यमंत्री आबिटकर यांच्या मंत्रालयीन दालनात सार्वजनिक आरोग्य विभागाच्या विविध विषयांबाबत आढावा बैठक झाली. या बैठकीस आरोग्य विभागाचे सचिव ई. रवींद्रन, आरोग्य आयुक्त डॉ. कादंबरी बलकवडे, आरोग्य संचालक डॉ. विजय कंदेवाड, सहसंचालिका डॉ. सुनिता गोल्हाईत यांच्यासह वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

सार्वजनिक आरोग्य विभागाच्या वतीने राज्यात दि. १८ डिसेंबर ते १५ जानेवारी २०२६ या कालावधीत सिकलसेल अभियानाची पूर्व तयारी करण्यात येईल. त्यानंतर दि. १५ जानेवारी ते ३१ जानेवारी २०२६ या कालावधीत सिकलसेल तपासणी विशेष पंधरवडा राबविण्यात येणार आहे. या तपासणी मोहिमेदरम्यान सिकलसेल आजाराचे प्रमाण अधिक असलेल्या २१ जिल्ह्यांमध्ये एकही नागरिक तपासणीपासून वंचित राहू नये, यासाठी सर्व यंत्रणांनी प्रभावी नियोजन करावे. सिकलसेल आजाराचे लवकर निदान, रुग्णांना योग्य उपचार व संदर्भ सेवा उपलब्ध करून देणे अत्यंत महत्त्वाचे असून, राज्यात एकही सिकलसेल रुग्ण तपासणीपासून वंचित राहू नये, असेही मंत्री आबिटकर यांनी सांगितले.

यावेळी आरोग्यमंत्र्यांनी सार्वजनिक आरोग्य विभागांतर्गत कार्यरत वैद्यकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांचे पगार दरमहा १ ते ५ तारखेपर्यंत अदा झाले पाहिजेत, पगार अदा करण्यात दिरंगाई झाल्यास संबंधित अधिकाऱ्याला जबाबदार धरले जाईल, असेही मंत्री आबिटकर यांनी स्पष्ट केले. तसेच जिल्हा आरोग्य संस्थांनी आवश्यकतेनुसारच खरेदी करावी, अनावश्यक खर्च टाळावा व कार्यात पारदर्शकता ठेवावी, अशा सूचनाही आरोग्यमंत्र्यांनी या बैठकीत दिल्या.

# शेत रस्त्याच्या प्रकरणांवर तात्काळ निर्णयासाठी जिल्हास्तरीय सक्षम यंत्रणा राबवावी

## - प्रहार संघटनेचे जालना तालुका अध्यक्ष नरेश वाढेकर

**प्रत्यक्ष शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन जागेवरच शेत रस्ता देण्याची मागणी**

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना / प्रतिनिधी/** शेतकऱ्यांच्या आणि शेतीच्या सर्वांगीण विकासासाठी शेत रस्ता ही अत्यावश्यक गरज आहे. यासंदर्भात मा. मुख्यमंत्री व महसूल मंत्री यांनी विविध शासन निर्णय जारी केले असून, प्रसारमाध्यमांतून या योजनेचा मोठ्या प्रमाणावर प्रचार करण्यात आला आहे. त्यामुळे साधा अर्ज केल्यास शेतकऱ्यांना त्यांच्या शेतासाठी हक्काचा रस्ता मिळेल, या अपेक्षेने तहसील कार्यालयात मोठ्या प्रमाणावर अर्ज दाखल होत आहेत.

मात्र प्रत्यक्षात ही प्रक्रिया अत्यंत किचकट आणि गुंतागुंतीची ठरत असल्याचा अनुभव शेतकऱ्यांना येत आहे. अर्ज केल्यानंतर तहसील कार्यालयातील यंत्रणेमार्फत होणारी आवहेलना, वारंवार चकरा, कारकूनी भाषेतील शाब्दिक खेळ यामुळे शेतकरी त्रस्त झाले आहेत. तहसीलदारांनी आदेश दिला तरी तो अनेकदा कागदापुरताच मर्यादित राहतो. त्याची अंमलबजावणी करण्यासाठी पुन्हा स्वतंत्र कागदी प्रक्रिया करावी लागते.

प्रकरण उपविभागीय अधिकारी (एसडीएम) यांच्याकडे गेल्यानंतर वकील, तारखा आणि दीर्घकाळ चालणारी ससेहोलपट सुरू होते. न्याय मिळाल्यानंतरही प्रत्यक्ष रस्ता मिळवताना अनेक अडचणी, खर्च आणि मानसिक ताण सहन करावा लागतो. परिणामी शेतकऱ्यांचा वेळ व पैसा वाया जातो, शेतीची कामे खोळंबतात आणि शासन यंत्रणेबाबत नकारात्मक अनुभव येतो.या संपूर्ण प्रक्रियेमुळे शेतकरी वर्गात शासन व प्रशासनाबाबत तीव्र निराशा आणि हताशा निर्माण झाली आहे. हे सुशासन नसून शोषण करणारे शासन असल्याची भावना जनमानसात तयार होत आहे. या निराशेतून शेतकरी आत्महत्येकडे प्रवृत्त होण्याची शक्यता नाकारता येत नाही, अशी गंभीर चिंता प्रहार संघटनेचे जालना तालुका अध्यक्ष नरेश वाढेकर यांनी व्यक्त केली.या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकाऱ्यांनी या विषयाची गांभीर्याने दखल घेऊन वैयक्तिक लक्ष घालावे. जिल्हास्तरावर एक सक्षम व स्वतंत्र यंत्रणा निर्माण करून, प्रत्यक्ष शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन जागेवरच निर्णय घेऊन सर्व शेतांना तात्काळ शेत रस्ता उपलब्ध करून द्यावा, अशी ठाम मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. तसेच शेत रस्त्यापासून वंचित व पीडित शेतकऱ्यांनी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे. शेतकऱ्यांना हक्काचा शेत रस्ता न मिळाल्यास प्रहार संघटना जिल्हाभर तीव्र आंदोलन छेडेल, असा इशाराही नरेश वाढेकर यांनी दिला आहे.

# अल्पसंख्याकासाठी असणाऱ्या विविध योजना लोकांपर्यंत पोहोचवा-अपर जिल्हाधिकारी रमेश मिसाळ

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना (प्रतिनिधी)** दरवर्षी १८ डिसेंबर रोजी देशभरात अल्पसंख्याक दिन साजरा केला जातो. राष्ट्र उभारणीत योगदान म्हणून अल्पसंख्याक समुदायांच्या हक्कांचे रक्षण करण्यासाठी आणि अल्पसंख्याकांना त्यांच्या स्वतःच्या भाषा, जात, धर्म, संस्कृती, परंपरा इत्यादींमध्ये सुरक्षितता सुनिश्चित करण्यासाठी हा दिवस साजरा केला जातो. शासनाने अल्पसंख्याक समुदायाच्या विकासासाठी विविध कल्याणकारी योजना तयार केलेल्या असून या योजना जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोहोचवा, असे प्रतिपादन अपर जिल्हाधिकारी रमेश मिसाळ यांनी केले.

अल्पसंख्याक हक्क दिनानिमित्त जिल्हाधिकारी कार्यालयातील महसूल सभागृहात आज कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी ते बोलत होते. याप्रसंगी निवासी उपजिल्हाधिकारी शशिकांत हदगल, पोलिस निरीक्षक रईतवार, उपशिक्षणाधिकारी श्री.पवार, श्री.कायंदे, निरंतर शिक्षण विभागाचे शेख वसीम यांची प्रमुख उपस्थिती होती.

अपर जिल्हाधिकारी मिसाळ म्हणाले, अल्पसंख्याक समाजास त्यांच्या घटनात्मक आणि कायदेशीर हक्काची जाणी व माहिती व्हावी यासाठी महाराष्ट्र शासनाकडून १८ डिसेंबर हा दिवस अल्पसंख्याक हक्क दिवस म्हणून आयोजित करण्याच्या सुचना आहेत. हा दिवस विविध सांस्कृतिक, भाषिक आणि धार्मिक पार्श्वभूमीतील व्यक्ती शांततेत आणि समानतेने एकत्र राहू शकतील असा समावेशक समाज निर्माण करण्याच्या राष्ट्राच्या वचनबद्धतेचे प्रतिबिंबित करतो. शासन अल्पसंख्यांकाच्या समाजाच्या आर्थिक व शैक्षणिक उन्नतीसाठी विविध योजना राज्यभर राबवित येत असल्याचेही त्यांनी यावेळी सांगून जिल्ह्यात अल्पसंख्याक समाजाच्या स्वयंसेवी व अशासकीय संस्था स्वयंस्फुर्तीने चांगले काम करत असल्याने त्यांनी संबंधित संस्थांचे कौतूकही केले.


मौलाना आझाद अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडळाचे जिल्हा व्यवस्थापक एकनाथ कांबळे यांनी महामंडळाच्या मुस्लिम, बौध्द, शीख, पारशी, ख्रिश्चन आणि ज्यू समाजाच्या सामाजिक व आर्थिक उन्नतीसाठी विविध कर्ज योजना, प्रशिक्षण योजना, सुशिक्षीत बेरोजगारासाठी व्यावसायिक कर्ज, विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक कर्ज योजना, महिलांच्या आर्थिक प्रगतीसाठी सुक्ष्म पतपुरवठा योजनेची यावेळी सविस्तर माहिती दिली. निरंतर शिक्षण विभागाचे शेख वसीम यांनी अल्पसंख्याकांना मिळणाऱ्या महाराष्ट्र शासन व केंद्र शासनाच्या विविध योजनांची सविस्तर माहिती यावेळी दिली. याप्रसंगी अल्पसंख्याक समुदायातील विविध प्रतिनिधींनी आपले मनोगत व्यक्त करुन काही सूचना केल्या. या कार्यक्रमास अल्पसंख्याक समुदायातील अशासकीय संस्था यांच्यासह महिला व पुरुषांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# धुळे जिल्ह्याचे सुपुत्र, महाराष्ट्र भूषण राम सुतार यांच्या रूपाने कलाक्षेत्रातील भीष्माचार्य हरपला - मंत्री जयकुमार रावल

**आत्ताच एक्सप्रेस**

**आत्ताच एक्सप्रेस**

**मुंबई / प्रतिनिधी/** धुळे जिल्ह्याचे सुपुत्र जगप्रसिद्ध शिल्पकार, महाराष्ट्र भूषण राम सुतार यांचे आज नोएडा येथील त्यांच्या निवासस्थानी वयाच्या १०१ व्या वर्षी निधन झाले. त्यांच्या निधनाची बातमी अत्यंत दुःखद आहे. त्यांच्या जाण्याने देशाच्या कलाक्षेत्रात मोठी हानी झाली असून त्याच्या रूपाने कलाक्षेत्रातील भीष्माचार्य हरपला, अशा शब्दांत पणन व राजशिष्टाचार मंत्री जयकुमार रावल यांनी शोकसंवेदना व्यक्त केल्या.राम सुतार यांनी आपल्या प्रतिभासंपन्न, समर्पित आणि प्रामाणिक कलाकर्तृत्वातून ‘स्टॅच्यू ऑफ युनिटी’सह अनेक अजरामर शिल्पकृती निर्माण केल्या. जगातील सर्वोत्तम शिल्पकला साकारण्याचे ध्येय डोळ्यासमोर ठेवून त्यांनी आयुष्यभर अविश्रांतपणे कला क्षेत्राची सेवा केली. अनेक महापुरुषांच्या शिल्पकृती साकारताना त्यांनी अपार मेहनत, धैर्य आणि अद्वितीय समर्पण दाखवले.



भगवान बुद्ध, भगवान महावीर, स्वामी विवेकानंद यांच्यासह अनेक महान विभूतींच्या मूर्ती त्यांनी अत्यंत जिवंत आणि चित्तवेधक शैलीत साकारल्या. त्यांच्या या अद्वितीय शिल्पकलेमुळे देशासह धुळे जिल्ह्याचे नाव सातासमुद्रापार पोहोचले आहे. असे मंत्री रावल यांनी म्हटले आहे.

## प्रगती विद्यालयाचे राज्यस्तरीय ११ विद्यार्थी ‘डॉ. होमी भाभा बालवैज्ञानिक’ स्पर्धेसाठी निवडले

**आत्ताच एक्सप्रेस**

**बीड/ प्रतिनिधी/** प्रगती शिक्षण संस्था, बालेपीर, बीड येथे स्थित प्रगती विद्यालयाचे विद्यार्थ्यांनी राज्यस्तरीय ‘डॉ. होमी भाभा बालवैज्ञानिक’ परीक्षा मुंबई सायन्स रिचस असोसिएशनमार्फत दिली. या परीक्षेत विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी अत्युत्कृष्ट कामगिरी करत ११ जण सेकंड लेव्हलवर पात्र ठरले. ही परीक्षा अत्यंत कठीण असून विद्यार्थ्यांच्या शिस्त, अभ्यास आणि संस्कार यांचे फलित ठरली.

सेकंड लेव्हलवर पात्र विद्यार्थ्यांची यादी:

इयत्ता नववी:शेवंते स्वराली अंकुश,सदगर कल्याणी दादाहरी,सांगळे अभिषेक अंबादास,तांदळे हरीश महेश,राजनंदनी रामहरीनागरगोजे,माने सार्थक नितीन,बागलाने प्रथमेश धोंडीराम

इयत्ता सहावी:आघाव साहिल बाळू,कुमारी तांबडे कुमुदनी बाबुराव,आरेकर अथर्व अंकुश,दराडे तुषार आप्पासाहेब विद्यार्थ्यांच्या गुणवंत यशाबद्दल संस्थेचे संस्थापक आदरणीय रामकृष्ण जी बांगर, सचिव सौ सत्यभामाताई रामकृष्ण बांगर, युवा नेता विजयसिंह बांगर, विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री गोपाळघरे सर, तसेच शिक्षक आणि पालकवृंद यांनी मनःपूर्वक अभिनंदन केले आणि पुढील परीक्षांसाठी शुभेच्छा दिल्या.

# जालना महानगरपालिकेच्या दिरंगाईमुळे जीविताला धोका; सर्वोच्च न्यायालयाचा दिल्लीतील निर्णय जालन्यासाठी इशारा

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना (प्रतिनिधी)** शहरातील धोकादायक इमारतींबाबत जालना महानगरपालिकेच्या संथ आणि उदासीन कारभारामुळे नागरिकांच्या जीवितास मोठा धोका निर्माण झाला आहे. एकीकडे शहरात तब्बल ६२३ धोकादायक इमारती असल्याचे अधिकृत नोंदीत नमूद असताना, केवळ नोटिसा बजावून पुढील कारवाईकडे दुर्लक्ष केले जात आहे. दुसरीकडे, अशाच प्रकारच्या दिरंगाईसाठी सर्वोच्च न्यायालयाने दिल्ली महानगरपालिकेला १० लाख रुपयांचा दंड ठोठावल्याने जालना महानगरपालिकेसाठी हा निर्णय दिशादर्शक आणि इशारादायक ठरत आहे.

या पार्श्वभूमीवर ड. महेश एस. धनावत यांनी महापालिकेच्या भूमिकेवर तीव्र चिंता व्यक्त केली आहे.

**नोटीस देऊन हात झटकण्याचा प्रकार – धनावत**

धनावत म्हणाले,जालना महानगरपालिकेचा कारभार अत्यंत संथ आहे. दरवर्षी पावसाळ्यापूर्वी धोकादायक इमारतींना नोटिसा दिल्या जातात; मात्र त्यानंतर कोणतीही ठोस कारवाई होत नाही. शहरातील ऐतिहासिक वारसा असलेला ‘पाणी वेस’ दरवाजा अत्यंत जीर्ण अवस्थेत असून तो कधीही कोसळू शकतो. याबाबत उपविभागीय अधिकारी कार्यालयाकडे तक्रार करूनही आणि त्यांनी महापालिकेला नोटीस देऊनही अद्याप कोणतीही कारवाई झालेली नाही. हा प्रकार अत्यंत गंभीर असून नागरिकांच्या सुरक्षिततेशी खेळ आहे.

**सर्वोच्च न्यायालयाचा दणका**

दिल्लीतील एका महत्त्वाच्या प्रकरणात, ८५ वर्षे जुन्या जीर्ण घराच्या पुनर्बांधणीसाठी १५ वर्षे परवानगी नाकारून त्रास दिल्याबद्दल सर्वोच्च न्यायालयाने दक्षिण दिल्ली महानगरपालिकेला (आताची दिल्ली महानगरपालिका) १० लाख रुपयांची नुकसानभरपाई देण्याचे आदेश दिले. साऊथ दिल्ली म्युनिसिपल कॉर्पोरेशन विरुद्ध भारत भूषण जैन (मृत) 2025 LiveLaw (SC) ११२१ या प्रकरणात न्यायमूर्ती जे.बी. पारडीवाला आणि के.व्ही. विश्वनाथन यांच्या खंडपीठाने स्पष्ट शब्दांत म्हटले की, नागरिकांना धोकादायक घरात राहण्यास भाग पाडणे आणि पुनर्बांधणीसाठी परवानगी नाकारणे हे सरळ-सरळ छळवणूक आहे.न्यायालयाने केवळ नुकसानभरपाईच नव्हे, तर चार आठवड्यांत इमारत आराखड्यास मंजुरी देण्याचे निर्देशही दिले.

**जालन्यातील वास्तव अधिक गंभीर**

जालना शहरात सध्या ६२३ धोकादायक इमारती अस्तित्वात आहेत. यामुळे भविष्यात कोणतीही मोठी दुर्घटना घडल्यास जबाबदारी कोणाची, हा गंभीर प्रश्न निर्माण होतो.महानगरपालिकेच्या मते, इमारत पाडण्याची जबाबदारी मालकाची असून ही प्रक्रिया खर्चिक असल्याने पालिका पुढाकार घेत नाही. मात्र, नागरिकांचे जीवित रक्षण करणे हे प्रशासनाचे मूलभूत कर्तव्य असल्याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले जात असल्याचा आरोप होत आहे.

**नव्या आयुक्तांकडून अपेक्षा**

भ्रष्टाचार प्रकरणात अटक झाल्यानंतर माजी आयुक्त संतोष खांडेकर यांच्यानंतर जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी महानगरपालिका आयुक्तपदाचा अतिरिक्त कार्यभार स्वीकारला आहे. त्यांच्या नियुक्तीमुळे शहरातील रखडलेली कामे मार्गी लागतील, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

धनावत म्हणाले,नव्या आयुक्त तथा जिल्हाधिकारी मित्तल मॅडम यांनी या विषयात जातीने लक्ष घालून धोकादायक इमारती आणि ऐतिहासिक वास्तूंच्या संवर्धनासाठी तातडीची पावले उचलावीत. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयातून बोध न घेतल्यास जालना महानगरपालिकेलाही भविष्यात अशाच कायदेशीर कारवाईला सामोरे जावे लागेल.

# ‘बार्टी’तर्फे एमपीएससी अभियांत्रिकी मुलाखत तयारीसाठी आर्थिक सहाय्य

**आत्ताच एक्सप्रेस**

**मुंबई/ प्रतिनिधी/** डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी) तर्फे राज्यातील अनुसूचित जाती प्रवर्गातील उमेदवारांसाठी आर्थिक सहाय्य योजना जाहीर करण्यात आली आहे. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची अभियांत्रिकी मुख्य परीक्षा २०२४ मध्ये उत्तीर्ण होऊन मुलाखतीस पात्र ठरलेल्या उमेदवारांना या योजनेअंतर्गत एकरकमी दहा हजार रुपये आर्थिक सहाय्य देण्यात येणार आहे. मुलाखतीसाठी पात्र झालेल्या उमेदवारांनी यांचा लाभ घेण्याचे आवाहन बार्टीचे महासंचालक सुनील वारे यांनी केले आहे.

या योजनेचा लाभ घेण्यासाठी उमेदवार महाराष्ट्रातील अनुसूचित जातीचा असावा. उमेदवार १३ नोव्हेंबर २०२५ रोजी जाहीर झालेल्या ०५४/२०२५ च्या महाराष्ट्र लोकसेवा आयोग अभियांत्रिकी मुख्य परीक्षा उत्तीर्ण असावा.

अर्जाची संपूर्ण प्रक्रिया पूर्णपणे ऑनलाईन असून अर्ज करण्यासाठी बार्टीच्या https://forms.gle/nkVisRqmndp1qp-M9 या लिंकवर फॉर्म आणि आवश्यक माहिती उपलब्ध करुन देण्यात आली आहे. आवश्यक कागदपत्रांसह अर्ज २७ डिसेंबर २०२५ रोजी सायंकाळी पाच वाजेपर्यंत भरण्याची मुदत देण्यात आलेली आहे. एकाच विद्यार्थ्याने वेगवेगळी माहिती भरून एकापेक्षा जास्त वेळा अर्ज केल्यास संबंधित विद्यार्थ्याची उमेदवारी रद्द करण्यात येईल, अशी स्पष्ट सूचना देण्यात आली आहे.

उमेदवाराने ऑनलाईन अर्जा व्यतिरिक्त अर्जाची स्व-साक्षांकित प्रत बार्टी, पुणे कार्यालयास २७ डिसेंबर २०२५ रोजी सायंकाळी पाच वाजेपर्यंत सादर करावी. अर्ज पाठविण्यासाठीचा पत्ता, डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था, (बार्टी) २८/ कीन्स गार्डन, कॅम्प पुणे ४११००१ असून अधिक माहितीसाठी ०२०-२६३३३३३०/२६३३३३३९ येथे संपर्क करावा. अर्जाच्या लिफाफ्यावर ‘एम.पी.एस.सी अभियांत्रिकी २०२५ मुलाखतीसाठी आर्थिक सहाय्य असे नमूद करण्याचे आवाहन बार्टी कार्यालयामार्फत करण्यात आलेले आहे.

# महाराष्ट्र भूषण राम सुतार यांच्यावर शासकीय इतमामात अंत्यसंस्कार

**आत्ताच एक्सप्रेस**

**नवी दिल्ली / प्रतिनिधी /** जगप्रसिद्ध शिल्पकार महाराष्ट्रभूषण राम सुतार यांच्या पार्थिवावर आज नोएडा येथील वैकुंठ स्मशानभूमीत शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले. महाराष्ट्र शासनाच्या वतीने राजशिष्टाचार व पणन मंत्री जयकुमार रावल यांनी पुष्पचक्र अर्पण करून आदरांजली वाहिली. तसेच केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांनीही आदरांजली वाहिली.

जगातील सर्वात उंच पुतळा असलेल्या ‘स्टॅच्यू ऑफ युनिटी‘चे शिल्पकार राम वंजी सुतार यांचे वृद्धापकाळाने नोएडा येथील निवासस्थानी वयाच्या १०१ व्या वर्षी निधन झाले होते. आज दुपारी नोएडा येथील वैकुंठ भूमीत संपूर्ण शासकीय इतमामात स्व. सुतार यांच्या पार्थिवावर अंतिम संस्कार करण्यात आले. महाराष्ट्र शासनाच्या वतीने यावेळी मंत्री जयकुमार रावल यांनी यावेळी आदरांजली वाहिली.

श्री.रावल म्हणाले, जागतिक कीर्तीचे महान शिल्पकार पद्मविभूषण राम सुतार यांनी ‘स्टॅच्यू ऑफ युनिटी’सह अनेक ऐतिहासिक शिल्पांच्या माध्यमातून भारताची ओळख जागतिक पातळीवर नेली. त्यांच्या निधनाने कला क्षेत्राची मोठी हानी झाली आहे. हुबेहूब आणि जिवंतपणा हे त्यांच्या कलेचे वैशिष्ट्य होते.त्यांची शिल्पे ही त्यांच्या महान कार्याची नेहमी साक्ष देतील.

यावेळी केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले म्हणाले महाराष्ट्राचे सुपुत्र राम सुतारजी यांचे शिल्पकला क्षेत्रात त्यांचे मोठे योगदान आहे. छत्रपती शिवाजी महाराज,महात्मा गांधी, डॉ बाबासाहेब आंबेडकर यांसह अनेक मान्यवरांचे पुतळे बनवले. त्यांनी दिल्लीमध्ये राहून महाराष्ट्राचा नावलौकिक वाढविला. त्यांच्या कलाकृती अजरामर राहतील. त्यांचे पुत्र त्यांचा वारसा चालवतील असेही श्री आठवले यांनी सांगितले.

अंत्यसंस्कारापूर्वी स्व. सुतार यांचे पार्थिव त्यांच्या निवासस्थानी दर्शनासाठी ठेवण्यात आले होते. यावेळी महाराष्ट्र शासनाच्या निवासी आयुक्त व सचिव आर विमला, माहिती संचालक हेमराज बागुल, सहायक निवासी आयुक्त नितीन शेंडे यांनी महाराष्ट्र शासन सांस्कृतिक विभागाच्या वतीने श्रद्धांजली अर्पण केली. तसेच गौतम बुद्ध नगरच्या जिल्हाधिकारी मेधा रुपम यांनी उत्तर प्रदेश सरकारच्या वतीने श्रद्धांजली अर्पण केली. कला, सामाजिक, राजकीय क्षेत्रातील मान्यवरांसह स्व.सुतार यांच्या चाहत्यांनी त्यांच्या पार्थिवाचे दर्शन घेतले. यावेळी त्यांचे पुत्र अनिल सुतार यांच्यासह त्यांच्या कुटुंबातील सदस्य उपस्थित होते.

गेल्याच महिन्यात सुतार यांना ‘महाराष्ट्र भूषण २०२४२ पुरस्कार प्रदान करण्यात आला होता. हा पुरस्कार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व अजित पवार आणि सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार यांनी नोएडा येथे जाऊन त्यांच्या निवासस्थानी प्रदान केला.

**मुख्यमंत्री फडणवीस यांची भावपूर्ण श्रद्धांजली**

मुख्यमंत्री फडणवीस यांनी सुतार यांच्या पुत्र अनिल सुतार यांना दूरध्वनी करून शोकसंवेदना व्यक्त केल्या. ते म्हणाले, काहीच दिवसांपूर्वी ‘महाराष्ट्र भूषण‘ पुरस्कार प्रदान करण्यासाठी आम्ही त्यांच्या घरी गेलो होतो. पुरस्कार स्वीकारताना त्यांनी ‘महाराष्ट्र माझा‘ गीताच्या ओळी उच्चारल्या होत्या, तेव्हा आम्ही भारावून गेलो होतो. वयाच्या १०० व्या वर्षीही ते इंदू मिल येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारकाच्या कामात गुंतले होते. त्यांची शिल्पे शतकानुशतके जिवंत राहतील आणि प्रत्येक शिल्प पाहताना त्यांचेच स्मरण होईल. मी त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करतो. त्यांच्या कुटुंबीयांच्या दुःखात आम्ही सहभागी आहोत.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक सुग्रीव सोपानराव मुंढे यांनी निरंकारजी प्रिंट ॲण्ड पब्लिकेशन, पी-३०/०/२,गुलमोहर कॉलनी,एन-५, सिडको, छत्रपती संभाजीनगर-४३१००३ (महाराष्ट्र), येथे छापून पी-३०/०/२, गुलमोहर कॉलनी, एन-५, सिडको, छत्रपती संभाजीनगर-४३१००३ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
मुख्यकार्यालय-०२४०-२४७४८१३, संपादक-सुग्रीव सोपानराव मुंढे मो.९४२१२८१०७८ , RNI.No.MAH/MAR2011/39247
The Printer, Owner & Publisher **Sugriv Sopanrao Mundhe** Print at Nirankarji Print & Publication, P-30/0/2, Gulmohar Colony, N-5 CIDCO, Chhatrapati Sambhajinagar -431003 (M.H.) Published at P-30/0/2, Gulmohar Colony, N-5 CIDCO, Chhatrapati Sambhajinagar -431003. (**Editor - Sugriv Sopanrao Mundhe**) Office Ph. : 0240-2474813